मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | गुरुवार, २६ जून २०२५ | वर्ष: ११ | अंक: २१७ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

## रायगड, रत्नागिरीसाठी ऑरेंज अलर्ट

**मुंबई , दि. २५ प्रतिनिधी**

कोकणसह मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम आहे. दरम्यान, पुणे, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्याच्या घाट क्षेत्रासाठी २५ ते २९ जूनपर्यंत ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या घाट क्षेत्रांतील काही ठिकाणी पुढील चार दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने वर्तवली आहे. रायगडसाठी २९ जून रोजी, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी २७ ते २९ जून दरम्यान ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यासाठी २५ ते २८ जून दरम्यान आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी २५ ते २६ जून दरम्यान यलो अलर्ट दिला आहे. पालघर, ठाणे, मुंबईतील काही भागात २७ ते २९ जूनपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदूरबार, जळगाव जिल्ह्यातही विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.




आई आशा यांचे डोळे पाणावले

# शुभांशूची अवकाशात झेप

## 'ॲक्सिओम ४' अंतराळात झेपावले

**फ्लोरिडा, दि. २५ वृत्तसंस्था**

**भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन आणि इस्रोचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी आज यशस्वीरित्या अवकाशात झेप घेत इतिहास रचला आहे. ४१ वर्षांपूर्वी राकेश शर्मा यांनी केलेल्या ऐतिहासिक अंतराळ प्रवासानंतर, अंतराळात जाणारे ते दुसरे भारतीय ठरले आहेत. अनेक तांत्रिक अडचणींवर मात करत, भारतीय वेळेनुसार आज दुपारी १२ वाजून १ मिनिटांनी ॲक्सिओम मिशन ४ (ॲक्स-४) अंतर्गत स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटने ड्रॅगन अंतराळयानासह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे (आयएसएस) उड्डाण केले.**

ॲक्सिओम-४ नावाच्या या मोहिमेत शुभांशू शुक्ला मिशन पायलट म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्यासोबत अमेरिकेच्या अनुभवी अंतराळवीर कमांडर पेगी व्हिटसन, पोलंडचे स्लावोज उज्नास्की-विस्नीव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापू हे मिशन विशेषज्ञ म्हणून सहभागी झाले आहेत. ही मोहीम ॲक्सिओम स्पेस या खासगी कंपनीद्वारे आयोजित करण्यात आली आहे, जिचे उद्दिष्ट अंतराळ प्रवास सर्वांसाठी खुला करणे आहे.

शुभांशू शुक्ला यांचे अंतराळयान अवकाशात झेपावल्यानंतर उत्तर प्रदेशमध्ये असलेल्या त्याच्या आई आशा शुक्ला यांचे डोळ पाणावले. त्यांनी मुलाच्या सुखरूप प्रवासासाठी हात जोडले.

शुक्ला आणि त्यांचे सहकारी १४ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहणार आहेत. या काळात ते अनेक महत्त्वपूर्ण वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भाग घेतील. इस्रोने खास शुक्ला यांच्यासाठी तयार केलेले सात प्रयोग ते करणार आहेत, ज्यामध्ये सूक्ष्म-गुरुत्वाकर्षणाच्या स्थितीत मेथी आणि मुगाला अंकुरित करण्यासारख्या प्रयोगांचा समावेश आहे. याशिवाय ते नासाच्या पाच संयुक्त अभ्यासांमध्येही सहभागी होतील.

अक्सिओम मिशन-४ वरील शुक्ला यांच्या अनुभवाचा इस्रोच्या गगनयान अंतराळ उड्डाण मोहिमेत खूप चांगला उपयोग केला जाईल. इस्रो अक्सिओम-४ मोहिमेवर ५५० कोटी रुपये खर्च करत आहे.

हा संपूर्ण देशासाठी खरोखर अभिमानाचा क्षण आहे. मी त्याची बहीण आहे म्हणून खूप आनंद, खूप प्रेम आहेच पण चिंता ही आहे. काहीही झाले तरी चांगलेच होईल, मला खात्री आहे, आम्हाला खात्री आहे की तो त्याचे ध्येय यशस्वीरित्या आणि सुरक्षितपणे पूर्ण करेल. शुभांशू आपल्या सर्वांसाठी एक मोठी प्रेरणा बनला आहे, असे शुची मिश्रा (शुभांशू शुक्ला यांची बहीण) यांनी म्हटले आहे.

**प्रवासादरम्यान, शुभांशू शुक्ला यांनी देशवासीयांना उद्देशून एक संदेश पाठवला आहे. या संदेशामध्ये शुभांशू शुक्ला म्हणाले की, नमस्कार, माझ्या देशवासियांनो. काय सुंदर प्रवास आहे हा. ४१ वर्षांनंतर आपण पुन्हा अंतराळात पोहोचलो आहोत. यावेळी आम्ही ७.५ किमी प्रतितास वेगाने पृथ्वीच्या चहुबाजूला फिरत आहोत. माझ्या खांद्यावर माझा तिरंगा आहे. जो मला सांगतोय की, मी एकटा नाही आहे. मी तुम्हा सर्वांसोबत आहे.**

**ते पुढे म्हणाले की, माझा हा प्रवास आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने जाणारा प्रवास नाही तर भारताच्या मानवी अंतराळ मोहिमेची सुरुवात आहे. तुम्ही सर्वांनीही या प्रवासात सहप्रवासी बनावे, अशी माझी इच्छा आहे. तुम्हा सर्वांची छाती अभिमानाने फुगली पाहिजे. या आपण सर्वांनी मिळून भारताच्या मानवी अंतराळ मोहिमेची सुरुवात करूया. जय हिंद, जय भारत!**

अग्रलेख

## खरीखरी

## पुढची थाळी सोन्याची

**जगात भारत नावाचा एक देश आहे. त्या देशाची महती अशी आहे की, त्या देशाची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकाची आहे. याच भारतात महाराष्ट्र नावाचे एक अतिप्रगत राष्ट्र आहे, म्हणजेच राज्य आहे. हा महाराष्ट्र प्रांत कधी एकेकाळी अतिशय श्रीमंत होता असे म्हणतात. आता गेल्या काही वर्षापासून या श्रीमंत महाराष्ट्राच्या घरात चणचण सुरू झालेली आहे. तीस वर्षांपूर्वी या राज्याला चाळीस हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागले. तत्पूर्वी या राज्यावर कोणतेही कर्ज नव्हते. आता या कर्जाचा आकडा नऊ लाख कोटी रुपयांचा झालेला आहे. दिवसेंदिवस उत्पन्न घटत आहे. तरी आपली शानोशौकत कमी करायला हे राज्य अजिबात तयार नाही. भारतातील राज्यांचा खर्च यावर देखरेख आणि नियंत्रण ठेवून तो खर्च कमी करण्यासाठी अंदाज समित्या नेमण्यात येतात. तशाच प्रकारे या महाराष्ट्र राज्याचा खर्च कमी करण्यासाठी अंदाज समिती नेमण्यात आली. यांचे काम राज्याच्या खर्चाचा अंदाज घेऊन तो खर्च कसा कमी करता येइल. यासाठी प्रयत्न करणे असे असते. या कमिटीचे सदस्य आणि त्यांचे केंद्रीय पाहुणे मिळून जवळजवळ अडीचशे ते साडेतीनशे लोक असतात. ही समिती चालू राहावी. म्हणून समितीच्या सेवेसाठी जवळपास तेवढेच अधिकारी कर्मचारी असतात. या अंदाज समितीचा सर्व खर्च राज्य शासनाच्या तिजोरीतून केला जातो. आपल्या कर्जबाजारी असलेल्या आणि अनेक योजनांसाठी निधींची चणचण असलेल्या या राज्यातील अशाच अंदाज समितीचा दौरा मुंबइतून मुंबइतच होता. आता खर्च कमी करण्यासाठी तो खर्च वाढवला गेला पाहिजे. असा कदाचित या कमिटीचा किंवा समितीचा समज असावा. खर्च कसा आणि कुठे वाढवता येइल याची सुरुवात स्वतःपासून करून तो कमी कसा करता येइल. याचे सखोल चिंतन करण्यासाठी या समितीचे साग्रसंगीत उदरभरण करणे गरजेचे असते. किंबहुना ते ओघाने येतेच. आता यासाठी झालेल्या खर्चाकडे पाहूया. या समितीच्या सदस्यांना जेवण वाढण्यात येणाऱ्या चांदीच्या ताटाचे भाडे अवघे ५५० होते. या ताटात जे जेवण वाढण्यात येणार होते. त्या प्रत्येक थाळीचा दर ४५०० होता. म्हणजे एका माणसाच्या थाळीचा खर्च (चांदीच्या ताटाचे भाडे पकडून) पाच हजार पन्नास रुपये होता. त्यावर नेहमीप्रमाणे जीएसटीचा खर्च असेलच. तो वेगळा आहे त्यामुळे तात्पुरता तो सोडून देऊया. आता पाच हजार पन्नास गुणिले सहाशे या गणिताचा हिशेब करण्याची आमची बुद्धी आणि क्षमता नाही. अशा या श्रीमंती जेवणानंतर खर्चात कपात कशी करणार. यावर चर्चा झाल्यावर बहुतेक सध्या महाराष्ट्रात दहा-बारा रुपये शिवभोजन थाळी मिळते. त्या थाळीच्या दरात तीन ते चार रुपयाची वाढ केल्यावर बऱ्यापैकी फायदा होइल. म्हणजेच प्रत्येक थाळीमागे जे सरकारी अनुदान दिले जाते. त्यात कोट्यावधी रुपयांची बचत होइल. असा या समितीचा अंदाज कदाचित निघू शकतो. आता पाच हजार पन्नास रुपयांच्या थाळीत काय काय होते. त्याची माहिती अशी आहे की, त्यात पुरणपोळी होती. ती पुरणपोळी मुंबइतीलच कुटुंब सखीच्या स्टॉलवर अवघ्या वीस किंवा २५ रुपयात मिळते. अंदाज समितीला वाढलेल्या गरमागरम पुरणपोळी वर लोणकढ्या तुपाची धार होती. ही आमची लोणकढी थाप नाही. त्यासोबतच दहीवडे, वेगवेगळ्या प्रकारच्या खिरीचे पदार्थ, राइस प्रिपेरेशन मध्ये पुलाव आणि बिर्याणीच्या वेगवेगळ्या रेसिपी अगदी जातीने हजर होत्या. त्यामध्ये बासमती, वाडा कोलम ते दिल्ली राइस पर्यंतचे वेगवेगळे प्रकार, दोन-चार प्रकारच्या शाकाहारी अतिशय उत्तम पनीर आणि चीजयुक्त भाज्या अगदी वरमाइ सारख्या मिरवत होत्या. त्या सोबत शाही नवरत्न कोरमा या विशेष शाकाहारी भाजीचाही समावेश होता. अंदाज समिती मधल्या मत्स्यप्रेमींसाठी सध्या मासेमारी बंद असली. तरी फ्रोजन फिश मधील लपापेदार तळलेल्या सुरमइचा आणि पापलेटचा एक वेगळाच रवा फ्राय आणि तवा फ्राय असा खास बेत होता. बाकी चिकन मटण यामध्ये रस्सा, विशेष करून मालवणी रस्सा, कोकणी रस्सा, बोनलेस आणि स्पेशल बटर मध्ये फ्राय केलेल्या वेगवेगळ्या डिश सुद्धा उपलब्ध होत्या. एवढा मोठा शाही सरंजाम खाऊन झाल्यावर आणि त्यामुळे पोट फुगल्यानंतर उतारा म्हणून वेगवेगळ्या बादशाही फालूद्यांचे आणि वेगवेगळ्या फ्लेवरच्या कुल्फींचे विशेष आइस्क्रीमही त्यांच्यासाठी उपलब्ध होते. आपल्या राज्यातील सर्वसामान्य मध्यमवर्गीय परिवाराचा महिन्याभराचा चार ते पाच सदस्यांचा खर्च साधारणपणे पाच ते साडेपाच हजार रुपये असतो. तो नेमका किती असतो. याचे सर्वे किंवा अंदाज या अंदाज समित्यांनीच करावे अशी आमची शिफारस आहे. कोणताही माणूस जो श्रमजीवी आहे. तो साधारणपणे एका महिन्यात एका जेवणात अडीचशे ते तीनशे ग्रॅम फार्फार तर ४०० ग्राम अन्न खातो. म्हणजे प्रति ग्रॅम प्रत्येक माणसासाठी किती खर्च केला गेला. याचे गणितही याच समितीने करावे. या भोजनामध्ये आमच्यासारख्या सामान्य जनांना आमंत्रण अजिबातच नव्हते. म्हणूनच आम्ही हे शब्दभोजन खास करून करीत आहोत. विशेष म्हणजे या समितीने काही अतिउच्च समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात नव्हे तर फक्त मुंबइत दोन-तीन भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या अतिउच्च वर्गीय प्रतिनिधींना म्हणजेच काही विशेष पत्रकारांना विशेष करून आमंत्रित केले होते. त्यामुळे अशा या लोकप्रतिनिधींच्या मेजवानीला नावे ठेवणाऱ्या महाराष्ट्र टाइम्सच्या पूर्वी संपादक असलेल्या गोविंदराव तळवलकर यांची आठवण येत आहे. काही वर्षांपूर्वी माजी आमदार शंकरराव मोहिते पाटील यांच्या चिरंजीवाच्या लग्नात एक लक्ष लोकांना भोजन देऊन त्याचा खर्च त्यांनी उचलला होता. त्या एक लक्ष लोकांच्या भोजनाचा जेवढा खर्च होता. त्यापेक्षा जास्त खर्च या साधारण २५० ते ५०० लोकांच्या भोजनात केला गेला. असे आम्ही नाही तर बरेच लोक म्हणतात. ते लक्ष भोजन होते आजचे हे लक्षात राहणारे भोजन आहे. यात सर्वपक्षीय योजनानंदी भोजनानंदात रममाण होणारे अनेक जण सामील झाले होते. बाकी ताजमहाल हॉटेल आणि ट्रायडेंट हॉटेल यामध्ये राहणाऱ्या व्हीआयपी आणि त्यांच्या अधिकाऱ्यांच्या खर्चाबद्दल न बोललेलेच बरे. अंदाज समितीच्या रूपाने शाही भोजन खाणाऱ्या सर्व प्रकारची कृपादृष्टी असलेल्या, या सर्व भोजनभाऊंना पुढच्या वेळी सोन्याच्या ताटात अन्न मिळावे. अशा आमच्या आतापासूनच शुभेच्छा!**

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## गेल्या ११ वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी- खरगे

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत आणि संविधान निर्मितीत योगदान दिले नाही. ज्यांनी हे संविधान बनवण्यात सहकार्य केले नाही. जे नेहमीच संविधानाविरुद्ध बोलत होते. भाजप देशव्यापी 'संविधान बचाव आंदोलनाला' घाबरत आहे, म्हणूनच आज ते पुन्हा आणीबाणीबद्दल बोलत आहेत, असा घणाघात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. भाजपकडून आणीबाणीला ५० वर्ष झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला टीकेची झोड उठवल्यानंतर खरगे यांनी पत्रकार परिषद घेत भाजपचा चांगलाच समाचार घेतला. 'गेल्या ११ वर्षांपासून देशात अघोषित आणीबाणी' असल्याचा हल्लाबोल त्यांनी केला. जर आज आपले संविधान संकटात असेल तर ते नरेंद्र मोदींमुळे आहे. नरेंद्र मोदी देशाला उद्ध्वस्त करत आहेत. जेव्हा जेव्हा एखादा व्यक्ती देशाच्या हितासाठी बोलतो तेव्हा नरेंद्र मोदी ते सहन करू शकत नाहीत. शेवटी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि चळवळीचे स्वातंत्र्य कुठे आहे? जर एखादा विद्यार्थी देशाच्या हितासाठी बोलला तर त्याला देशद्रोही म्हटले जाते. जर एखादा पत्रकार काही लिहितो तर त्याला तुरुंगात टाकले जाते. जर एखाद्या मासिकाने सरकारच्या उणीवांबद्दल लिहिले तर तेही नरेंद्र मोदी आणि त्यांचे सरकार स्वीकारत नाही. ज्या सरकारमध्ये लोकांना बोलण्याचे स्वातंत्र्य नाही त्या सरकारमधील लोकांकडून काहीही अपेक्षा करता येत नाही. केवळ भाषणांनी पोट भरत नाही, असा हल्लाबोल त्यांनी केला.

## आज भारतामध्ये कुठल्याही चौकात उभे राहून देशाच्या पंतप्रधानांना शिव्या देऊ शकता - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

आणीबाणीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान संपविण्यात आले होते. सर्वच विरोधी पक्ष त्यावेळी आणीबाणीच्या विरोधात रस्त्यावर उतरले. त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. ज्यांचे लग्न झाले नव्हते, त्यांचेही कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन करण्यात आले. अनेक घरांची तोडफोड करण्यात आली. अनुशासनाच्या नावाखाली अशरक्षः उन्माद त्या काळात देशाने पाहिला. या सर्वांची बातमी होऊ नये म्हणून वृत्तपत्रावर निर्बंध आणले गेले", अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणीबाणीच्या विरोधात बोलताना दिली.

संविधान हत्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत असताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "अलीकडे कुणीही उठते आणि लोकशाहीची गळचेपी, लोकशाहीची हत्या होत आहे, असे सांगते. पण त्यांनी आणीबाणीच्या कालखंडाकडे बघितले पाहिजे. मग त्यांच्या लक्षात येईल की, आज भारतामध्ये कुठल्याही चौकात उभे राहून देशाच्या पंतप्रधानांना शिव्या देऊ शकता. तरी तुमच्यावर कुणीही कारवाई करत नाही. भारताची लोकशाही आज जिवंत आहे. कारण त्याकाळी लोकतंत्र सेनानींनी संघर्ष करून लोकशाही टिकवली."

देशात लागू केलेल्या आणीबाणीच्या निर्णयाला ५० वर्ष झाल्यानिमित्त आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ मुंबई येथे संविधान हत्या दिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.


आणीबाणीमध्ये झालेल्या गळचेपीची माहिती देतान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांचे उदाहरण दिले. फर्नांडिज भूमीगत झाल्यामुळे त्यांचा भाऊ आणि आईचा खूप छळ करण्यात आला. ज्यामुळे त्यांच्या भावाला जबर मानसिक धक्का बसला, त्यातून ते बाहेर येऊ शकले नाहीत, अशी आठवण फडणवीस यांनी सांगितली. तसेच तुरूंगात टाकलेल्या अनेकांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली. त्यामुळेच आम्ही लोकतंत्र सेनानींचा सन्मान करण्यासाठी २०१७ साली मानधन देण्याचा निर्णय घेतला, असेही ते म्हणाले.

## शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध

**सांगली, दि. २५ प्रतिनिधी**

सांगलीत कृष्णा नदीकाठच्या गावांबरोबरच आटपाडी तालुक्यातील शेतकऱ्यांचाही शक्तीपीठला विरोध वाढला आहे. आटपाडी तालुक्यातील शेटफळे गावामधून जाणाऱ्या शक्तिपीठसाठी सुरू झालेली जमीन मोजणी शेतकऱ्यांनी बंद पाडली. अधिकारी मोजणी करण्यास आलेल्या जमिनीवर झोपून आंदोलन करत शक्तीपीठ रद्द करण्याची शेतकऱ्यांनी मागणी केली. मोजणी करण्याआधी भरपाईचे निकष जाहीर करावेत अशीही शेतकऱ्यांची मुख्य मागणी आहे.

आटपाडी तालुक्यात शक्तीपीठ महामार्गासाठी आज शेटफळेत दुसऱ्यांदा मोजणीस सुरुवात झाली. मात्र, शेतकऱ्यांनी तगड्या पोलिस बंदोबस्तातही मोजणीला तीव्र विरोध केला. शक्तीपीठमध्ये शेटफळे गावातील सुमारे ४२९ शेतकऱ्यांच्या जमिनींचा समावेश असून, ४० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र बाधित होणार आहे. महसूल विभागाने मोजणीसाठी केवळ एक दिवस आधी, म्हणजे मंगळवारी, शेतकऱ्यांना नोटीसा पाठवल्या. याआधीही मोजणीसाठी आलेल्या पथकाला शेतकऱ्यांच्या विरोधाचा सामना करावा लागल्याने मोजणी रद्द करण्यात आली होती. मोजणी करण्याआधी भरपाईचे निकष जाहीर करावेत अशीही शेतकऱ्यांची मुख्य मागणी आहे. यासंदर्भात प्रांताधिकारी डॉ. विक्रम बांदल यांनी दोन वेळा शेतकऱ्यांसोबत बैठकाही घेतल्या. मात्र, प्रशासनाने यावेळी कोणतीही भरपाई जाहीर न करता मोजणी सुरू केल्याने नाराजी वाढली आहे. आज मोजणीवेळी तहसीलदार सागर ढवळे आणि पोलीस निरीक्षक विनय बहिर हे घटनास्थळी उपस्थित होते. प्रशासनाकडून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तरीही शेतकऱ्यांनी शांततेत पण ठाम विरोध नोंदवत मोजणीला विरोध केला. प्रशासनाची पुढील भूमिका काय असेल आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांना दाद दिली जाईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# वाढवणमध्ये पुन्हा संघर्ष भडकला

**डहाणू, दि. २५ : प्रतिनिधी**

पालघरच्या बहुचर्चित वाढवण बंदर प्रकल्पाच्या विरोधात स्थानिक ग्रामस्थांचा संघर्ष पुन्हा पेट घेत असून, या प्रकल्पाविरोधातील रोष बुधवारी सकाळी उफाळून आला. जेएनपीए (JNPA) कडून वाढवण समुद्रकिनारी सुरू करण्यात आलेला ड्रोन सर्वे ग्रामस्थांच्या तीव्र आणि एकसंघ विरोधामुळे थांबवावा लागला. कोणतीही पूर्वसूचना न देता खाजगी कंपनीकडून चोरीछुपे सुरू झालेल्या या सर्वेच्या विरोधात ग्रामस्थांनी जोरदार निषेध करत, हे लोकशाही व्यवस्थेचे सरळसरळ उल्लंघन असल्याचा आरोप केला आहे.

बुधवारी (दि. २५ जून) सकाळी सुमारास ITDCG या खाजगी कंपनीकडून वाढवण समुद्रकिनारी ड्रोनद्वारे हाईटाईड लाटांचा(उंच भरती) अभ्यास करण्याचा प्रयत्न सुरू झाला. या कामाची जबाबदारी JNPA ने ITDCG या कंपनीकडे सुपूर्त केली असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. मात्र, ग्रामपंचायतीला कोणतीही अधिकृत माहिती दिली नसताना व स्थानिक जनतेला विश्वासात न घेता सुरू करण्यात आलेल्या या सर्वेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि हा सर्वे थांबवला. वाढवण विरोधी संघर्ष समिती, युवा संघर्ष समिती आणि स्थानिक ग्रामस्थांनी एकत्र येत या सर्वेक्षणाला आक्रमक विरोध केला. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, ग्रामस्थांनी पोलिसांवरच दिशाभूल करण्याचा आरोप लावला.



पोलिसांनी "सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे" असे खोटे सांगून ग्रामस्थांची फसवणूक केली, असा ठपका ग्रामस्थांनी ठेवला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वाढवण बंदर प्रकल्पाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिला असून, कोणत्याही प्रकारच्या सर्वेक्षणाची जबाबदारी "निरी" या स्वतंत्र संस्थेला देण्यात आलेली आहे. अशा वेळी, ITDCG सारख्या खाजगी कंपनीकडून चोरीछुपे सर्वे सुरू करणे हे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन असून, सरकारच न्यायालयाचा अवमान करत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जर सरकार कायदेशीरपणे काम करत असेल, तर सर्वेक्षण गुपचूप का? आणि स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे ग्रामपंचायतीची परवानगी का घेण्यात आली नाही? वाढवणकरांनी सरकारला थेट सवाल करत स्पष्ट केले की, "आमच्या जमिनी, आमचा समुद्र, आमचे हक्क आम्ही सोडणार नाही. हे केवळ बंदर विरोधी आंदोलन नाही, तर आमच्या हक्कांची लढाई आहे. हे सगळं एक मोठं षड्यंत्र आहे. लोकशाहीच्या मूल्यांना पायदळी तुडवून प्रकल्प रेटण्याचा प्रयत्न केला जातोय. आम्ही कधीही झुकणार नाही. सरकार कितीही पोलीस बंदोबस्त आणो, खाजगी कंपन्यांच्या मदतीने दबाव टाको, तरी आम्ही प्रत्येक पावलावर लढा देणार.अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

याआधीही भू-संपादन, सर्वेक्षण आणि मोजणीच्या विविध टप्प्यांवर स्थानिकांनी संघर्ष केला आहे. मात्र आजचा प्रकार म्हणजे संघर्षाची ठिणगी पुन्हा पेटली असून, हा लढा आता निर्णायक वळणावर पोहचल्याचे स्पष्ट होत आहे. "बंदर नाहीच उभं राहू देणार," हा निर्धार पुन्हा एकदा प्रकट झाला आहे. ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन, दिशाभूल करणाऱ्या खोट्या माहितीचा वापर आणि खाजगी कंपनीमार्फत छुपे सर्वे हे सर्व मुद्दे न्यायालयात मांडले जातील. सरकारने जर याची गंभीर दखल घेतली नाही, तर आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र होईल, असा इशाराही देण्यात आला आहे. वाढवणकरांचा आवाज बुलंद होत आहे.

प्रकल्पाचे नाव घेताच पेटणारा हा विरोध केवळ विकासविरोधी नाही, तर अन्यायाविरोधी आहे. वाढवण बंदर प्रकल्पाबाबतचा संघर्ष आता केवळ जमीन किंवा समुद्रापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो लोकशाही, स्वाभिमान आणि हक्काच्या रक्षणासाठीचा बनलेला आहे. सरकार आणि प्रशासनाने याचा गांभीर्याने विचार केला नाही, तर वाढवणच्या किनाऱ्यावरचा संघर्ष अधिक भडकणार असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## गुपचूप सुरू झालेला ड्रोन सर्वे ग्रामस्थांनी रोखला

गावातील नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित सर्वे एजन्सीने थेट पोलिसांकडे धाव घेतली. ना पोलिसांकडून, ना एजन्सीकडून आम्हाला कोणतीही माहिती देण्यात आली. यामुळेच गावकऱ्यांनी एकत्र येऊन समुद्रकिनारी सुरू असलेलं ड्रोन सर्वेक्षण थांबवलं.

**- भूषण भोईर, स्थानिक ग्रामस्थ**

पावसाळी वातावरण आणि वाऱ्यामुळे ड्रोनच्या सर्वेसाठी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने तात्पुरता सर्व्हे थांबवावा लागला आहे. काही सर्व्हे करण्यात आले आहेत आणि येत्या एक-दोन दिवसांत उर्वरित सर्व्हे पोलिस बंदोबस्तात पूर्ण करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीला वेळोवेळी याबाबत अवगत करण्यात आले असून याआधी ग्रामसभा घेऊन नागरिकांना जेएनपीटी आणि प्रशासनामार्फत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

**- महेश सागर, उपजिल्हाधिकारी - पालघर**

## निलंबित वाय. एस. रेड्डी यांचा नामफलक अखेर हटवला

**वसई, दि. २५ : प्रतिनिधी**

वसई-विरार महापालिकेच्या नगररचना विभागाचे निलंबित उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांचा मुख्यालयात असलेला नामफलक अखेर प्रशासनाने हटवला आहे. रेड्डी यांच्यावर निलंबनाची कारवाई झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने त्यांच्या दालना बाहेर लावलेली पाटी तत्काळ हटवण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. रेड्डी यांच्याविरोधात सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या कारवाईनंतर आयुक्त अनिलकुमार पवार यांनी रेड्डींना निलंबित करण्याची कारवाई केली होती.



त्यानंतरही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या स्मृती महापालिका प्रशासन जपत आहे. तसेच रेड्डी यांच्या पुनरागमनाच्या प्रतिक्षेत महापालिका प्रशासन आहे का?, असा सवाल उपस्थित करण्यात आला होता. यातक्रारींची दखल घेत अखेर आयुक्त अनिलकुमार पवार यांना हा नामफलक उतरवावा लागला.

दि. १५ मे रोजी सक्त वसुली संचालनालय अर्थात ईडीमार्फत विविध ठिकाणी धाडी घालण्यात आल्या होत्या. यात रेड्डी याच्या हैदराबाद आणि वसई येथील निवासस्थानातून कोट्यवधी रुपयांची माया जमा जप्त केली होती. तेव्हापासून रेड्डी यांची चौकशी सुरू आहे. दरम्यान आयुक्त पवार यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती. असे असतानाही उपसंचालकाच्या दालनाबाहेर रेड्डी यांचे नामफलक लागलेले असल्यामुळे करदात्या नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात होता. सदर नामफलक हटवण्यात आलेला आहे. सध्या हे पद रिक्त आहे. या पदावर नवीन नियुक्ती झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याचा नामफलक लावण्यात येईल, अशी माहिती आयुक्त पवार यांनी दिली आहे.

## प्रश्न निवडणूक आयोगाला, मग उत्तर का देते भाजपा

### काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा यांचा आरोप

**वसई, दि. २५ : प्रतिनिधी**

खा. राहुल गांधी यांनी निवडणूकीतील हेराफेरी आणि फिक्सिंगबद्दल निवडणुक आयोगाला प्रश्न विचारला आहे. मात्र, निवडणुक आयोग यागंभीर प्रश्नावर उत्तर देत नाही. भाजप मात्र त्याला उत्तर देत आहे. त्यामुळे जनतेचा विश्वास आणखी कमी होत चालला आहे, असा आरोप काँग्रेसचे वसई विरार शहर जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा यांनी विचारला आहे. काँग्रेसने वसईत काढलेल्या मशाल यात्रेत ते बोलत होते.

वसईत काढण्यात आलेल्या मशाल यात्रेत बोलताना अल्मेडा यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खा. राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या प्रामाणिकपणाबद्दल उपस्थित केलेल्या चिंतनाला पाठिंबा देणे आणि त्यांनी अधोरेखित केलेल्या निवडणुकीतील कथित हेराफेरी आणि "मॅच-फिक्सिंग" चा तीव्र निषेध करणे हा या मशाल यात्रेमागील मुख्य उद्देश्य होता, असे सांगितले.




प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आणि जिल्हा प्रभारी जोजो थॉमस, वसई-विरार काँग्रेस समितीचे जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा, प्रदेश सरचिटणीस विजय पाटील, प्रदेश सचिव निलेश पेंढारी, धनराज राठोड, जिल्हा सरचिटणीस किरण शिंदे, डॉ. दिनेश कांबळे, नितीन उबाळे, विल्फ्रेंड डिसुझा, बिना फुर्ट्याडो, प्रविणा चौधरी, अश्रफ अली, सोहेल चौधरी, रतन तिवारी, अरनॉल्ड जिगुल, रामदास वाघमारे, आनंद चौबे, महफुज शेख, सज्जाद अन्सारी, रोहिणी कोचरेकर, राधा अय्यर, गोमती पाटील, प्रकाश पाटील, व्हेलंनटाईन मिर्ची,साबीर शेख, आलम अन्सारी, राकेश गोंसालवीस, तबारक खान, सुशीलकुमार यादव यापदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यामशाल यात्रेत सहभागी झाले होते.


## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

### महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.

पत्ता - सीटीसी क्र.११९/बी, प्रमिला अपार्टमेंट, तिसरा मजला, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६

**जाहीर समन्स**

वादी : भारत विकास को ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, ०५, लिली अपार्टमेंट, दर्गा मार्ग, अमृत नगर, मुंब्रा, जि. ठाणे यांनी यांनी मा. सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा), महाराष्ट्र राज्य सह. पत. फेडरेशन मर्या. जि. पुणे या कार्यालयाकडे संस्थेच्या थकबाकीदार व त्यांचे सर्व जामीनदार यांच्याविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी दावे दाखल केलेले आहेत. या सर्व थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांना त्यांचे म्हणणे मांडणेसाठी संधी देऊन दि.२८/०५/२०२५ व दि.११/०६/२०२५ रोजी सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा) पुणे शहर व्दारा महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, विभागीय कार्यालय, पश्चिम उपनगरे जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या -७-१/५, त्रिवेणी संगम, महिंद्र & महिंद्रा येलो गेट समोर, हनुमान नगर, अर्कुली रोड, कांदिवली (पूर्व) मुंबई ४००१०१. या कार्यालयात सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु खालील कर्जदार / जामीनदार यांना वेळोवेळी सुनावणी नोटीस दिलेल्या पत्त्यावर आर.पी.ए.डी. व्दारे पाठवूनही ते सुनावणीस हजर राहिलेले नाहीत. आता त्यांना शेवटची संधी देऊन त्यांचे म्हणणे मांडणेसाठी मा. सहा निबंधक, सह. संस्था (परसेवा), पुणे शहर, द्वारा महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, विभागीय कार्यालय, पश्चिम उपनगरे जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या-७-१/५, त्रिवेणी संगम, महिंद्र & महिंद्रा येलो गेट समोर, हनुमान नगर, अर्कुली रोड, कांदिवली (पूर्व) मुंबई ४००१०१. या कार्यालयात दि.०२/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणीसाठी बोलविण्यात येत आहे. ते याहीवेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास त्यांचे सदरील दाव्याबाबत काहीएक म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांचेविरुध्द वसुली प्रमाणपत्राबाबतचा दावा निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रतिवादी

| अ.क्र. | कर्जदार/जामीनदार नाव | पत्ता | दावा क्रमांक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | कर्जदार- श्री. शेख समिउल्लाह<br>जामिनदार - श्री कुशवाह राज<br>जामिनदार- श्री मोहम्मद मुस्तकीम अब्दुल हकीम -] | खोली क्र. ए /१०३, पहिला मजला, कुवरजी रेसिडेन्सी, विष्णू नगर, ओम पब्लिक स्कूल जवळ, डायघर गाव, कल्याण शिळ रोड, पोस्ट- पॅडल, ठाणे, महाराष्ट्र-४२१२०४.<br>खोली क्र. ३०३/सी-२, निर्मल नगरी, खर्डी गाव, दिवा शिळ रोड, ठाणे, महाराष्ट्र-४००६१२.<br>खोली क्र.१०३ ओम साई अपार्टमेंट, चिंतामणी नगर, कल्याण फाटा, ठाणे, महाराष्ट्र-४२१२०४. | ४८८ | १,८५,८१२/- |
| ०२ | कर्जदार -श्रीमती. म्हात्रे रेश्मा दिलखुश<br>जामिनदार- श्री. म्हात्रे बिपिन गोवर्य<br>जामिनदार- श्री. गुप्ता शोभा रामधारी | देसाई कल्याण शील रोड, दुर्गा माता मंदिराजवळ, तांबडीचा पाडा पाडले, ठाणे, महाराष्ट्र-४२१२०४.<br>देसाई कल्याण शील रोड, तांबडीचा पाडा दुर्गा माता मंदिराजवळ, पाडळे, ठाणे, महाराष्ट्र- ४२१२०४.<br>कल्याण शिळ रोड, कटाई शिरढोण, निलजे, ठाणे, महाराष्ट्र-४२१२०४. | ४८९ | १,९५,३५०/- |
| ०३ | कर्जदार- श्री. इम्रान तौफिक इब्राहिम तौफिक<br>जामिनदार- श्री. सय्यद शाकिर शब्बीर इमाम<br>जामिनदार-. शेख मोहम्मद मुख्तार मोहम्मद जमशैद | खोली क्रमांक ४०६, साबीर प्लाझा, दर्गा रोड, अमृत नगर, मुंब्रा, ठाणे, महाराष्ट्र-४००६१२.<br>खोली क्रमांक ७०८- ७ मजला, युनिव्हर्सल टॉवर, एम. ई.एच. शाळेजवळ, अमृत नगर, मुंब्रा, ठाणे, महाराष्ट्र- ४००६१२.<br>खोली क्रमांक ०३ सदनिका चाळ, दर्गा रोड, शिवाजी नगर, मुंब्रा, ठाणे, महाराष्ट्र-४००६१२. | ४९० | १,०५,०१६/- |

शिक्का

**(हर्षित वसंतराव तावरे)**
मा. सहा निबंधक सह. संस्था (परसेवा)
म. राज्य सह. पतसंस्था फेडरेशन मर्या., पुणे


## पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्हा परिसरात पावसाचे ऑरेंज अलर्ट

**वसई, दि. २५ : प्रतिनिधी**

राज्यात पुढील २४ तासात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह नाशिक घाट, पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे.

कोकण किनारपट्टीला आज २५ जून २०२५ रोजी सायंकाळी ५-३० पासून रात्रौ ८-३० वाजेपर्यंत भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आय.एन.सी.ओ.आय.एस.) तर्फे पर्यंत ३.५ ते ४.१ मीटर पर्यंतच्या उंच लाटांचा इशारा देण्यात आला असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नीरा नदी पात्रात विसर्ग सुरू सातारा जिल्ह्यात वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरू असून धरणाची पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी दिनांक २४ जून २०२५ रोजी रात्री ११.०० वाजल्यापासून ३० हजार ५१३ क्युसेक्स विसर्ग नीरा नदी पात्रात सुरू करण्यात आला असून नागरीकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## दीपक सावंत यांना अतिरिक्त आयुक्तपदी पदोन्नती

**वसई, दि. २५ : प्रतिनिधी**

वसई विरार महापालिकेचे उपायुक्त दीपक सावंत यांना अतिरिक्त आयुक्तपदी पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानंतर वसई विरार महापालिकेच्या रिक्त असलेल्या अतिरिक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्याधिकारी केडरचे असलेले सावंत गेल्या दोन वर्षांपासून महापालिकेत उपायुक्त म्हणून कार्यरत आहेत. अतिरिक्त आयुक्तपदावर पदोन्नतीनंतर त्यांना वसई विरार महापालिकेतील रिक्त पदावर नियुक्त करण्यात आले आहे. मीरा भाईंदर महापालिकेचे उपायुक्त प्रसाद शिंगटे यांची फुरसुंगी उरळी देवाची नगरपरिषद येथे मुख्याधिकारीपदी बदली करण्यात आली आहे.

## नालासोपाऱ्यातील शाळा बॉम्बने उडवण्याची धमकी

**वसई, दि. २५ : प्रतिनिधी**

नालासोपाऱ्यातील मदर मेरी शाळा बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ईमेल पहाटे साडेचार वाजता शाळेच्या मुख्याध्यापकांच्या ईमेल आला होता. सकाळी शाळा सुरु झाल्यानंतर मुख्याध्यापकांनी ईमेल तपासला असता हा प्रकार उजेडात आल्यावर एकच घबराट पसरली होती. याप्रकरणी शाळा प्रशासनाने पोलिसांना पाचारण केल्यावर शाळा मोकळी करून बॉम्बचा तपास करण्यात आला. मात्र, ही अफवा असल्याचे उजेडात आले आहे. खबरदारी म्हणून शाळेला सुट्टी देण्यात आली. सायबर पोलिसांकडून आता ईमेल कोठून आला याचा शोध घेतला जाणार आहे.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सूचना**

खालील कामे करण्यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागवण्यात येत आहेत

| निविदा क्र. / अंदाजित रक्कम/ निविदा शुल्क / कामाचे स्वरूप | निविदा भरण्याची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|
| निविदा क्र.– काअ / भावि / टेंडर / टी– ०२/२०२५–२६ (EE/BND/TENDER/T-02/2025-26) निविदा रक्कम रु. ३,२५,०००/– निविदा शुल्क रु. ५९०/–<br>भांडुप विभाग कार्यालय, ईश्वरनगर उपविभाग कार्यालय, ईश्वरनगर शाखा कार्यालय व परिसरामध्ये साफसफाई कामाकरिता कंत्राटी निविदा. | ०२.०७.२०२५<br>वेळ – ११:00 वाजेपर्यंत |

संपर्क अधिकारी– अतिरिक्त कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं., सं.व.सु, विभाग, ईश्वर नगर, म. वि. रा. शिंदे मार्ग, भांडूप (प), मुंबई ४०० ०७८. दूरध्वनी क्र. ९९३०२६९५५४

वरील निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर दि. २४.०६.२०२५ पासून उपलब्ध आहे. निविदा वर दर्शवलेल्या दिनांक व वेळेपर्यंत ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यात येतील.

**कार्यकारी अभियंता, भांडुप**



## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email:panvelcorporation@gmail.com

**निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/५०२५/प्र.क्र. ०२/२१६८/२०२५** **दिनांक : २५/०६/२०२५**

**शहर अभियंता विभाग**
**जाहिर ई-निविदा सुचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Centeral Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी- १ शतमान पद्धतीनुसार जाहिर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/३१/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -अ, खारघर मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे. (एकूण १५भुखंड) | १२,४८,२१,१३१/- |
| २ | PMC/CE/३२/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -ब, कळंबोली मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे. (एकूण १४भुखंड) | १५,५५,१५,०२६/- |
| ३ | PMC/CE/३३/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क, कामोठे मधील विविध भुखंडांवर दैनिक बाजार बांधणे. (एकूण ०५भुखंड) | ७,०९,४५,३४९/- |
| ४ | PMC/CE/१३/ २०२५-२०२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड, पनवेल (पु. व प.) मधील भुखंडावर दैनिक बाजार बांधणे. (एकूण १४भुखंड) | १०,२०,८६,९६५/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.२७/०६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.२८६/२८९/२०२५**
**दिनांक :- २५/०६/२०२५**

# आणीबाणीची पन्नाशी!

**भारत सरकारने दरवर्षी २५ जून हा दिवस संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दिवस १९७५ च्या आणीबाणीच्या अमानुष वेदना सहन करणाऱ्या सर्वांच्या मोठ्या योगदानाचे स्मरण करेल. या निमित्ताने आणीबाणीच्या आठवणी जाग्या करणारा हा लेख.**

-----------------

२५ जून १९७५ रोजी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात जारी केलेल्या आणीबाणी विषयीच्या आठवणी देशातील जनता कधीच विसरणार नाही, कारण जगातील सर्वात मोठ्या लोकशाही प्रधान देशामध्ये अशा प्रकारची घटना घडेल असे त्या अगोदर कुणाला स्वप्नातही वाटले नसेल.

आणीबाणी मध्ये व्यक्ती स्वातंत्र्यावर आलेले बंधन, वृत्तपत्रांची झालेली मुस्कटदाबी, सक्तीची नसबंदी संबंधीच्या घटना आणि दिल्लीच्या तुर्कमान गेट येथील गरीबांच्या झोपड्यांवर फिरवलेला बुलडोझर या सर्व घटना कधीही न विसरता येणाऱ्या होत्या.आणीबाणी टाळता आली असती का? त्या परिस्थितीत आणीबाणीची खरच गरज होती का? तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपली पंतप्रधान पदाची खुर्ची वाचवण्यासाठी देशात आणीबाणी जारी केली का? असे अनेक प्रश्न आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेला पडले होते.

देशात आणीबाणी जारी केल्याला आता चार दशकांपेक्षा जास्त अवधी उलटून गेल्यानंतरही देशातील जनतेच्या मनातील आणीबाणी विषयीच्या आठवणी अद्याप पुसल्या गेलेल्या नाहीत.आणीबाणीच्या जखमेचे व्रण अद्याप कायम आहेत.त्या आणीबाणी विषयी या लेखात आपण विस्तृत आढावा घेणार आहोत.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या विरोधात निकाल देऊन त्यांची निवडणूक रद्द केल्यानंतरचा हा घटनाक्रम आहे.अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल बाहेर आल्यानंतर काही तासांतच गुजरात विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होऊ लागले.

सुरूवातीच्या निकालांवरून इंदिरा गांधी यांचा पक्ष (कॉंग्रेस) निवडणूकीत हरणार हे निश्चित झाले होते. कॉंग्रेस विरोधी पक्षांची मोट बांधून तयार झालेला जनता मोर्चा हा पक्ष कॉंग्रेसचा पराभव करून गुजरात मध्ये सत्तेवर येणार हे नक्की झाल्याने इंदिरा गांधी यांना दुहेरी धक्का बसला होता.एकीकडे अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार इंदिरा गांधी यांची निवडणूक रद्द झाली होती आणि दुसरीकडे गुजरात हे राज्य कॉंग्रेसच्या हातातून गेले होते.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालानंतर इंदिरा गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून जोरदारपणे होऊ लागली होती. इंदिरा मस्ट गो असा नारा विरोधकांकडून देण्यात येत होता.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विरोधात इंदिरा गांधी यांच्या कडून सर्वोच्च न्यायालयात अपील केले जाणार हे निश्चित होते आणि त्या ठिकाणी निकाल हा इंदिरा गांधी यांच्या बाजूने लागण्याची जास्त शक्यता होती.परंतु त्या प्रक्रियेमध्ये चार ते सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता होती.

सर्वोच्च न्यायालयाकडून अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाला विनाअट स्थगिती मिळाली असती तर इंदिरा गांधी यांना त्यांच्या पदावर राहण्यात कोणतीही अडचण येणार नव्हती. इंदिरा गांधी अल्पकाळासाठी आपले पद सोडण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात होते.

कोणत्याही प्रकारची राजकीय महत्त्वाकांक्षा नसलेले मंत्रीमंडळातील आपले सहकारी सरदार स्वरणसिंग यांच्याकडे त्या तात्पुरत्या काळासाठी पंतप्रधानपद सोपविणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजूने लागल्यास त्या सन्मानाने पुन्हा पंतप्रधान पदावर येणार होत्या. परंतु तसे होणार नव्हते.

इंदिरा गांधी यांच्या निकटच्या वतुर्ळातील अनेक जणांना असे वाटत होते की सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिरा गांधी यांनी आपल्या पदावरून बाजूला होणे त्यांच्या करता आणि देशाकरता फायद्याचे ठरेल. परंतु इंदिरा गांधी यांच्या तोंडावर हे सांगण्याची त्यांची हिंमत नव्हती.

इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळातील जवळ जवळ सर्व सहकारी, कॉंग्रेसशासित राज्यांतील सर्व मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे जवळ जवळ सर्व खासदार यांच्यात मात्र आपणच कसे जास्त निष्ठावंत आहोत, हे इंदिरा गांधी यांना दाखवण्यासाठी जणू स्पर्धाच सुरू होती.



अभय गोखले

इंदिरा गांधी यांनी आपले पद सोडण्याची बिलकूल आवश्यकता नाही असे ते इंदिरा गांधी यांना आग्रहाने सांगत होते. त्यांची निष्ठा किती खरी होती या बाबत संशयाला जरी वाव असला तरी त्यांना खरी भीती होती ती इंदिरा गांधी या तात्पुरत्या काळासाठी सुद्धा पदावरून दूर झाल्या तर आपल्या साम्राज्याला धक्का तर लागणार नाही ना?, इंदिरा गांधी यांच्या कृपेने त्यांनी जे साम्राज्य उभारले होते ते (त्या पदावर नसतील तर) कोसळणार तर नाही ना? अशी भीती त्यांना वाटत होती.

मात्र इंदिरा गांधी यांचे सुपुत्र संजय गांधी हे आपल्या मताबाबत ठाम होते.इंदिरा गांधी यांनी तात्पुरत्या काळासाठी राजीनामा देण्याची आवश्यकता नाही,असा सल्ला त्यांनी आपल्या आईला दिला होता. संजय गांधी यांनी तसा सल्ला दिल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या निकटच्या वर्तुळातील त्यांचे सहकारी काय समजायचे ते समजले.

मग इंदिरा गांधी यांच्या निवासस्थानाबाहेर रोज सभा होऊ लागल्या. इंदिरा गांधी यांनी राजीनामा देण्याची गरज नाही हे सांगण्यासाठी त्या सभा आयोजित करण्यात आल्या होत्या.अर्थात या सभांना गर्दी जमवण्यासाठी शेजारच्या राज्यांतून बसेसद्वारे माणसे आणण्यात आली. यामध्ये अर्थातच कॉंग्रेसशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची फार मोठी मदत झाली.

जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्ष इंदिरा गांधी यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करत होते.त्यांनी त्या करता मोठ्या सभा आयोजित केल्या होत्या, तसेच निषेध मोर्चेही काढले होते. याच सुमारास इंदिरा गांधी यांना विख्यात कायदेपंडित नानी पालखीवाला यांच्याकडून अनपेक्षितरीत्या पाठिंबा मिळाला. नानी पालखीवाला हे कॉंग्रेस विरोधी पक्षांचे सहानुभूतीदार समजले जात असल्याने त्यांनी दिलेला पाठिंबा आश्चर्यजनक असाच होता.

त्यांनी इंदिरा गांधी यांची केस लढवण्याची तयारी तर दाखवलीच शिवाय इंदिरा गांधी यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचा सल्लाही दिला. २४ जून १९७५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांच्या अपिलाबद्दलचा आपला निकाल सुनावला.

सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली, मात्र ती अट घालूनच. त्या अटीनुसार इंदिरा गांधी या त्यांच्या पदावर राहू शकणार होत्या, तसेच संसदेत त्या बोलूही शकणार होत्या, मात्र त्यांच्या अपिलाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्या संसदेत मतदान करु शकणार नव्हत्या.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांना उत्साहित करणारा होता.इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा म्हणून देशभर आंदोलन सुरू करण्याचा निर्णय जयप्रकाश नारायण यांनी जाहीर केला.

आपली ही योजना त्यांनी दिल्ली येथील रामलीला मैदानावरील प्रचंड जाहीर सभेत जाहीर केली. मात्र इंदिरा गांधी या गप्प बसणार नव्हत्या. विरोधकांच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी त्यांनी एक योजना तयार केली होती, त्यामध्ये त्यांना त्यांच्या अगदी जवळच्या सहकाऱ्यांनी मदत केली होती. ही योजना अतिशय गुप्त ठेवण्यात आली होती.

ही योजना तयार करण्यात इंदिरा गांधी यांना सर्वात मोलाचे सहकार्य केले होते ते सिद्धार्थ शंकर रे यांनी. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री असलेले सिद्धार्थ शंकर रे हे निपुण कायदेपंडित होते आणि इंदिरा गांधी यांना त्यांच्या लहानपणापासून ओळखत होते. सिद्धार्थ शंकर रे यांचे आजोबा सी.आर.दास आणि इंदिरा गांधी यांचे आजोबा मोतिलाल नेहरू हे चांगले मित्र होते.

२५ जून १९७५ रोजी रात्री अकरा वाजता इंदिरा गांधी राष्ट्रपती भवनात पोहोचल्या.त्यांच्या बरोबर सिद्धार्थ शंकर रे हे होते. देशामध्ये अंतर्गत आणीबाणी जारी करण्याचा निर्णय आपल्या सरकारने घेतला असल्याची माहिती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहमद यांना दिली. त्या संबंधीचा आपल्या मंत्रिमंडळाने पारीत केलेला ठराव खरे पाहता इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपतींना सादर करायला हवा होता.

परंतु सिद्धार्थ शंकर रे यांनी त्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले. या सर्व गोष्टी नंतर करता येतील, कारण पंतप्रधानांचा शब्द पुरेसा आहे, असे स्पष्टीकरण रे यांनी दिले. त्यावर राष्ट्रपतींनी कोणतेही स्पष्टीकरण मागितले नाही आणि कागदपत्रावर सही केली. त्यानंतर देशभरात आणीबाणी जारी करण्यात आली, जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था, हुकूमशाही मध्ये परावर्तित झाली.

■ ■ ■

# परिक्षेत कमी गुण मिळाले म्हणजे अपयश नव्हे !

बारावी चाचणी परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे पित्याने मुलीला बेदम मारहाण केली. यात तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सांगलीतील आटपाडी तालुक्यात घडली. रागाच्या भरात हा अमानुष प्रकार घडला असल्याचे समोर आले आहे.

या घटनेवरुन पालकांना सांगावेसे वाटते की, परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे मुलांवर रागावण्याऐवजी त्यांना समजून घेणं आवश्यक आहे. अपयशातून शिकण्याची संधी पालकांनी त्यांना द्यावी. मुलांची आवड, क्षमता ओळखून त्यानुसार मार्गदर्शन करणे अधिक फायदेशीर ठरते.

प्रेम, आधार आणि सकारात्मकतेने दिलेले प्रोत्साहनच मुलांना खऱ्या अर्थाने यशाच्या दिशेने घेऊन जाते. कधी कधी कमी गुण मिळालेलेच विद्यार्थी आयुष्यात मोठी भरारी घेतात. अपयश हे यशाच्या वाटेवरचं एक पाऊल असतं झ्र कमी गुण मिळाले म्हणजे अपयश नव्हे. प्रत्येक मुलाची, मुलीची क्षमता वेगळी असते. काही मुलं अभ्यासात चांगली असतात, तर काही कला, खेळ किंवा तंत्रज्ञानात उत्कृष्ट असतात. पालकांनी गुणाच्या आधारे मुलांची किंमत करू नये.

कमी गुण मिळणं किंवा नापास होणं म्हणजे आयुष्य संपलंच, असं नाही.₹ खरंतर, हे एक थांबलेलं पाऊल आहे झ्र संपूर्ण प्रवास नव्हे. अपयशातून शिकून पुढे जाणं हीच खरी यशाकडे नेणारी वाट आहे. अनेक यशस्वी लोकांनी सुरुवातीला अपयश पाहिलं, पण त्यांनी हार न मानता प्रयत्न सुरूच ठेवले. चूक झाली म्हणून संधी संपली असं नाही झ्र प्रत्येक नवीन दिवस नव्या संधी घेऊन येतो.



**ॲड. दत्तात्रय दिनकर फडतरे**
**पुणे. 7588072685**

शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकात लिहिलेलं ज्ञान नव्हे. ते अनुभवातून, संवादातून आणि पर्यावरणातून मिळणाऱ्या शिकवणीचा समावेशही असतो. शाळा हा शिक्षणाचा एक भाग आहे, पण खरी शिकवण आपल्याला आयुष्य देतं. नैतिक मूल्यं, सामाजिक जाणीव, संवादकौशल्य, सहकार्य आणि समजूतदारपणा हीसुद्धा शिक्षणाची महत्त्वाची अंगे आहेत.

शिक्षणाने माणूस विचार करणारा, संवेदनशील आणि जबाबदार बनतो. म्हणूनच, शिक्षणाचं खऱ्या अर्थाने महत्त्व शाळेच्या बाहेरही दिसून येतं. अशा अनेक यशस्वी व्यक्तींची उदाहरणे देता येतील. ज्यांनी कमी औपचारिक शिक्षण घेतले तरी आपल्या क्षेत्रात अपार यश मिळवलं आहे.

**सचिन तेंडुलकर** : क्रिकेटचा देव मानला जाणारा सचिनने शालेय शिक्षण पूर्ण केलं नव्हतं, पण क्रिकेट क्षेत्रात त्यांनी जागतिक कीर्ती मिळवली.

कैलाश सावंत (लोकल उद्योजक/ शेतकरी/ स्वयंपाकगृह चालक इ.) झ्र अशा अनेक ग्रामीण भागातील लोकांनी कमी शिक्षण असूनही स्वतःचा व्यवसाय उभा करून समाजात प्रेरणादायक उदाहरण निर्माण केलं आहे.

आपल्याकडे अशा अनेक स्त्रियांचे जीवनप्रवास प्रेरणादायी आहेत, ज्या कमी शिक्षण असूनही किंवा शालेय जीवनात अपयशी ठरल्या, तरी पुढे त्यांनी अथक मेहनतीने यश संपादन केलं. उदाहरण देता येतील.

**लता मंगेशकर** : भारताची गायनसम्राज्ञी. त्यांनी शिक्षण पूर्ण केलं नव्हतं, पण त्यांच्या आवाजाने आणि प्रतिभेने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध केलं.

**कल्पना सरोज** : यांचे सातवीत शिक्षण थांबले. बालविवाह, कौटुंबिक अत्याचार यांमुळे आत्महत्येचा प्रयत्न केला. पुढे मुंबईत छोटा व्यवसाय सुरू केला, कामगारांसोबत काम केलं. आज कमानी ट्यूब्स लिमिटेड₹ कंपनीच्या अध्यक्षा (Chairperson) . सरकारकडून पद्मश्री सन्मान प्राप्त झाला आहे . कल्पना सरोज यांना भारतातील ओरिजिनल स्लमडॉग मिलेनियर म्हणून ओळखले जाते.

**सुंदरी रविंद्रनाथ (संध्या बिंदू)** : शिक्षणात विशेष यश नव्हतं. स्वयंपाकाचा छंद होता, त्याचा उपयोग करून स्वतःची फूड ब्रँड सुरू केली. आज लाखो रुपयांची टर्नओव्हर असलेली गृहउद्योग मालकीण आहेत. अडचणी, पण हार न मानता पुढे गेल्या. आज त्या मोटिवेशनल स्पीकर, लेखक आहेत.

शिक्षण महत्त्वाचं असलं, तरी यशाचं एकमेव प्रमाण नाही. चिकाटी, मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्द असेल तर कमी शिक्षण असतानाही महिलांनी मोठं यश मिळवलं आहे. शिक्षण महत्त्वाचं असलं तरी केवळ पदवीनेच यश मिळतं असं नाही. आत्मविश्वास, कौशल्य, चिकाटी आणि मेहनत हीसुद्धा यशाची गुरुकिल्ली असते.

गुण कमी मिळाले, म्हणजे संधी संपल्या नाहीत, नवीन सुरुवातीसाठी ती एक शिकवण असते. यश मोजण्यासाठी मार्कशिट नाही, तर मनातील जिद्द आणि कष्ट लागतात. परीक्षा हा जीवनातील एक टप्पा आहे झ्र अंतिम ध्येय नाही. गुण थोडे कमी असतील, पण तुमच्यातील क्षमता अमर्याद असते.एक वाईट निकाल, एक अपयशी टप्पा, हे तुमच्या आयुष्याचा शेवट नाही, तर बदलाची संधी आहे.

गुण कमी मिळाले म्हणजे अपयश नव्हे , गुण हे फक्त परीक्षा मोजतात, प्रतिभा नव्हे. यशासाठी गुण नाही, तर जिद्द आणि चिकाटी लागते. परीक्षेत मिळालेले कमी गुण हे शेवट नव्हे, ते फक्त सुरुवातीचे टप्पे असतात.

कधी कधी कमी गुण मिळालेलेच विद्यार्थी आयुष्यात मोठी भरारी घेतात.अपयश हे यशाच्या वाटेवरचं एक पाऊल असतं झ्र थांबू नका, पुढे चालत राहा. गुणांनी तुमची किंमत ठरत नाही, तुमचं कर्तृत्व ठरवतं. इतिहासात अशा अनेक व्यक्ती आहेत, ज्या शिक्षणात सामान्य होत्या, पण जीवनात असामान्य यश मिळवून गेल्या.

**थोडक्यात....**

सांगलीतील घडलेल्या घटनेवरुन पालकांना सांगवेसे वाटते की , परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे मुलांवर रागावण्याऐवजी त्यांना समजून घेणं आवश्यक आहे. अपयशातून शिकण्याची संधी पालकांनी त्यांना द्यावी. तू हे करू शकतोस₹ तू हे करु शकतेस, असा आत्मविश्वास पालकांनी सतत दिला पाहिजे. मुलांची आवड, क्षमता ओळखून त्यानुसार मार्गदर्शन करणे अधिक फायदेशीर ठरते. प्रेम, आधार आणि सकारात्मकतेने दिलेले प्रोत्साहनच मुलांना खऱ्या अर्थाने यशाच्या दिशेने घेऊन जाते.

कमी गुण मिळाले म्हणजे अपयश नव्हे. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते. काही मुलं अभ्यासात चांगली असतात, तर काही कला, खेळ किंवा तंत्रज्ञानात उत्कृष्ट असतात. पालकांनी गुणाच्या आधारे मुलांची किंमत करू नये. त्यांना प्रेम, पाठिंबा आणि सकारात्मक मार्गदर्शन द्यावं.

मानसिक दबावामुळे अनेक मुलं निराश होतात. त्यामुळे पालकांनी मानसिकता बदलून, कायम त्यांच्या स्वप्नांना बळ द्यावं. त्यातच खऱ्या अर्थाने पालकत्व सामावलेले आहे .

■ ■ ■

# कर्करोग संशोधक डॉ. सुलोचना गवांदे

**(कालच्या अंकावरून पुढे)**

कर्करोगासारखे आजार हे विश्वव्यापी आहेत. ते कधीही, कुणालाही, कुठेही होऊ शकतात. त्यांची लक्षणे, उपाय आणि मुख्य म्हणजे प्रतिबंधक प्रयत्न हे सर्वसामान्य माणसापर्यंत पोचले तर रुग्णांना तर दिलासा मिळेलच परंतु या रोगाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता वाढेल.

हे ज्ञान बहुसंख्य लोकांपर्यंत पोचावे म्हणून गवांदे मॅडमचे ह्लकर्करोगः माहिती आणि अनुभवह्व हे पुस्तक जगातील अन्य भाषेत अनुवादित करण्यासाठी त्या त्या भाषिक व्यक्ती आणि संस्था यांनी स्वतःहून पुढे येण्याची गरज आहे.

गवांदे मॅडम इतक्या गंभीर विषयाशी निगडित असल्यामुळे त्या खूप कडक स्वभावाच्या, चेहऱ्यावर अती गंभीर भाव असलेल्या असतील, असे आपल्याला वाटेल. प्रत्यक्षात मात्र त्यांचा वागण्या-बोलण्यातील सहजपणा,आत्मियता पाहून पहिल्याच भेटीत त्या आपल्या आणि आपण त्यांचे होऊन जातो.

गर्व आणि अहंकाराचा लवलेश देखील त्यांच्यात नाहीये. कर्करोगावर संशोधन करणाऱ्या, त्या विषयी लिहिणाऱ्या, बोलणाऱ्या, जगभर होणाऱ्या परिषदांना सातत्याने उपस्थित राहणाऱ्या गवांदे मॅडम त्या याच का असा प्रश्न त्यांना पहिल्यांदाच भेटणाऱ्या व्यक्तीस निश्चितच पडत असणार यात मला तरी काही शंका वाटत नाही.

कर्करोगासारख्या गंभीर विषयावर संशोधन आणि सामाजिक जागरूकता करीत असतानाच ललित लेखन ही त्या खूप सुंदर करतात. मराठी भाषेवर त्यांचे उत्तम प्रभुत्व आहे. त्यांचे काही ललित लेख न्यूज स्टोरी टुडे पोर्टल आणि अन्य ठिकाणी प्रसिद्ध झाले आहेत.

आम्हा भुजबळ कुटुंबीयांसाठी गवांदे मॅडम यांची एक अविस्मरणीय आठवण आहे. आमची कन्या देवश्री हिने कोलंबिया विद्यापीठातून दोन वर्षांपूर्वी जेव्हा एम एस जर्नालिझम ही पदवी मिळवली होती,तेव्हा आम्ही पदवीदान समारंभासाठी अमेरिकेत गेलो असता त्यांनी आम्हा तिघांनाही त्यांच्या न्यू जर्सी येथील घरी अतिशय अगत्याने बोलावले होते.

पोर्टलच्या दुसऱ्या लेखिका, न्यू जर्सी येथीलच डॉ गौरी आणि त्याचे पती आशिष कंसारा यांना देखील आमंत्रित केले होते. त्यामुळे देवश्री चे एम एस चे सेलिब्रेशन आणि पोर्टलचे स्नेह मिलनच त्यांच्या घरी झाले.



उत्तरार्ध

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

या लेखाचे परीक्षण करताना गवांदे मॅडम यांनी एकच इच्छा व्यक्त केली, ती म्हणजे वाचकांनी त्यांचे पुस्तक किंवा यू ट्यूबवर उपलब्ध असलेले कार्यक्रम पाहून कर्करोगाबद्दल यथायोग्यरित्या जाणून घ्यावे आणि त्याबद्दल इतरांशी बोलावे. त्यातून बोध घेऊन या भयंकर व्याधीपासून स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला कसे दूर ठेवता येईल हे शिकावे, त्यादृष्टीने प्रयत्न करावेत.

वाचकांना तर्कनिष्ठ विचार करण्यास प्रवृत्त करावे, त्यांनी अंधश्रद्धा किंवा भूलथापांना बळी पडून पैसे अथवा मूल्यवान वेळ वाया घालवू नये, जर कुणाला कर्करोगाचा सामना करण्याची वेळ आली ते सुजाणपणे, धैर्याने करण्यास मार्गदर्शन मिळावे, या हेतूने कर्करोगाच्या उपचारांवर चालणारे संशोधन व नवीन औषधे यांची माहिती दिली आहे. यामुळे सर्वसाधारण व्यक्तीची कर्करोगाविषयीची जाण वाढावी अशी त्यांची सार्थ अपेक्षा आहे.

मी, माझे कुटुंब, माझी नोकरी, माझा व्यवसाय इतकेच आपले जग सीमित न ठेवता या अवघड आणि गहन रोगाबद्दल साध्या भाषेत शास्त्रोक्त माहिती देत असलेल्या आणि आपल्याला कर्करोग होऊच नये म्हणून आपली जीवनशैली कशी असावी, या विषयी आंतरिक तळमळीने काम करीत असलेल्या डॉ सुलोचना गवांदे या स्वार्थ आणि परमार्थ याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्यांच्या या मानवतावादी प्रयत्नांमध्ये, उपक्रमांमध्ये आपण काही हातभार लावू शकत असल्यास अवश्य लावू या.

■ ■ ■



# व्हॉट्स गोईंग ऑन... आय एम नॉट कल्चर

बाई जपान ची, नव्वद हजार खर्च करून हजारो किलोमीटर वरून भारतातील लेण्या पाहण्यासाठी मुंबई ला उतरते. खाजगी बसने अजिंठा वेरूळला पोहचते. सोबत एक हाय रेजुलेशन कॅमेरा, मॅप, एक आठवडा लेण्यांचा अभ्यास, एक प्रश्नांची यादी, अजिंठा वेरूळला येऊन खूप बारकाईने अभ्यास करतात. काही दगडमातीचे नमुने सोबत घेतात लेणी, पहाड, दगडाचे फोटो काढतात. बनवण्याची प्रक्रिया समजुन घेतात.

कलाकृतीचे निरिक्षण करतात आणि ज्यावेळेस जपानची बाई लेण्याचे फोटो काढत असते. त्यावेळेस भारतातील मुलं त्या बाईचे फोटो काढ़त असतात. ही बाब त्या बाईला खटकते ती बाई त्या मुलांना समजावून सागते.

He U Man Don't Capture, I am Not Culture
(लेण्याकडे बोट दाखवत )
This Is Culture, U Take Their Photos

पन तरी ती २५,३० वर्षाची मुलं ऐकत नाहीत आणि म्हणतात, मॅम वन फोटो यु एंड मी...

ती बाई कंटाळुन... ठीक आहे म्हणते आणि मुलं त्या बाईच्या खांद्यावर हात ठेऊन फोटो काढतात. हे असले प्रकार वेरूळ, गोवा भारतात बऱ्याच ठिकाणी घडतात.

मग ती बाई जपानला जाऊन तिथल्या लोकाना माहिती देते की, भारतातील कैलास मंदिर जगातलं एकमेव असं मंदीर आहे की जे वरून खाली बांधत आणलेले आहे, लोणार सरोवर जगातलं उल्कापातानं तयार झालेले एकमेव सरोवर आहे, गोव्याला आंतराष्ट्रीय दजार्चा समुद्रकिनारा आहे. आणि असं बरच काही, आणि आपल्या भारतातील मुलं घरी येऊन बाकीच्यांना सागतात की,

काय फॉरेनर होते? हा बघ फोटो हा ईथला हा तिथला फोटू, एखादा लेण्याजवळचा फेसबुकला टाकलेला फोटू पाहुन मित्र कमेंट करतो, Bro U Looking Hero

फक्त दिसत नाही ते हजारो वर्षापूर्वी तयार झालेली आजच्या इंजीनीअरला लाजवेल अशी कलाकृती. हा कलाकृतीचा अप्रतिम नमुना जो आपल्या देशाची शान असतो आणि जिथे जाउन आपल्यातील काही नमुने दीलच्या पानात A For Apple आणी B For Boll लिहुन येतात.

त्या मूर्खांना कलाकृतीबद्दल माहिती काय असणार? कारण इथे इतिहास हा विषय बोरींग समजला जातो, मराठी मध्ये टअ करणाऱ्यांना साधी कविता करता येत नाही, आणि आयुष्य AC मध्ये जाणारे ज्यांच्या पायाला माती लागत नाही, ते लोक शेतीवर आणी बिसलरी चे पाणी पिणारे लोक दूष्काळावर शोधनिबंध लिहित आहेत ....

१०० रूपयात दिवसभर काम करणारा घाम गाळतो आणि दिवसाला खूर्चीवर बसुन हजारो कमावणारे AC ची मागणी करत आहेत. ही आहे शोकांतिका.!

■ ■ ■

## वाचक लिहितात

### सश्रद्ध महाराष्ट्र!

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याचे म्हटले जाते. पुरोगामीत्व म्हणजे जेथे सर्व गोष्टी विज्ञानाच्या तराजूत मोजल्या जातात, देवभोळेपणा आणि श्रद्धांना येथे स्थान नाही; मात्र याच महाराष्ट्रात साजरा होणारा श्रद्धेचा महाउत्सव म्हणजेच आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलनोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का? याच महाराष्ट्राच्या नाशिक नगरीत दर १२ वर्षांनी भरणारा सिंहस्थ कुंभमेळा या श्रद्धेचा आणखी एक महोत्सव अशा श्रद्धाळू भक्तांच्या महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्रापेक्षा 'सश्रद्ध महाराष्ट्र' हेच विशेषण योग्य ठरेल.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.**

### किती हा त्रास?

नागपूर शहराच्या संत जगनाडे महाराज चौकानजिक उड्डाण पुल आणि मेट्रोचे काम सुरू आहे. या कामावरील वाहने चक्क रस्त्याच्या कडेला उभी केली जात असून, येथून एखादी दुचाकी काढणे जीवावर बेतण्यासारखे आहे. वाहतुक कोंडीमुळे बराच वेळ अडकून पडावे लागते.

■ **एक नागपूरकर**



## स्वयंपाकाचे तेल पुन्हा गरम करून वापरल्याने
# अनेक आजारांना निमंत्रण

भजी, चिप्स, समोसे किंवा काही भाज्या बनवण्यासाठी भरपूर तेल लागते. अशा परिस्थितीत, बरेच लोक उरलेले तेल साठवून ठेवतात. नंतर ते पुन्हा गरम करतात आणि दुसरे काहीतरी बनवण्यासाठी वापरतात. पण ते तेल पुन्हा पुन्हा गरम करून वापरल्याने तुमच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते.

स्वयंपाकाचे तेल पुन्हा गरम करणे आणि ते पुन्हा पुन्हा वापरणे आरोग्यासाठी हानिकारक आहे. तेल पुन्हा पुन्हा गरम केले की त्यात ट्रान्स फॅट्स आणि फ्री रॅडिकल्ससारखे हानिकारक रसायने तयार होतात.

वापरलेले तेल पुन्हा गरम करून उपयोगात आणल्यास पोटदुखी, गॅस, आम्लता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. जुन्या तेलाची चव, रंग आणि सुगंध देखील खराब होतो, ज्यामुळे अन्न हानिकारक बनते. वापरलेले तेल वारंवार वापरू नका. कारण त्यात जंतू आणि विषारी घटक वाढू शकतात. म्हणून, नेहमी ताज्या तेलात अन्न शिजवा आणि एकदा वापरल्यानंतर तेल पुन्हा गरम करणे टाळा.

**खराब कोलेस्ट्रॉल वाढवते :** काळे, धुरकट तेल पुन्हा गरम केल्याने शरीरात एलडीएल किंवा वाईट कोलेस्टेरॉलची पातळी वाढू शकते. एलडीएल कोलेस्टेरॉलचे उच्च प्रमाण हृदयरोग, स्ट्रोक आणि छातीत दुखण्याचा धोका वाढवू शकते.

**आम्लाचे प्रमाण वाढते :** जर तेल वारंवार गरम केले तर त्यात आम्लाचे प्रमाण वाढते. जर तुम्हाला पोटात आणि घशात जळजळ जाणवत असेल तर स्वयंपाकाचे तेल देखील याचे कारण असू शकते. जर तुम्हाला नेहमीपेक्षा जास्त आम्लता जाणवत असेल तर जंक आणि तळलेले पदार्थ खाणे टाळा.

**विषारी पदार्थांचे प्रमाण वाढते :** सूर्यफूल किंवा कॉर्न ऑइल सारखी काही वनस्पतीचे तेल पुन्हा गरम केल्यानं त्यातील विषारी पदार्थांचे प्रमाण वाढतं, ज्यामुळे हृदयरोग, अल्झायमर, डिमेंशिया आणि पार्किन्सनसह अनेक आजार होतात. वनस्पती तेल पुन्हा गरम केल्याने 4-हायड्रॉक्सी-ट्रान्स-2-नोमिनल (HNE) नावाचे आणखी एक विष बाहेर पडते, जे डीएनए, आरएनए आणि प्रथिने योग्यरित्या कार्य करण्यापासून रोखते.

**ट्रान्स फॅट वाढवते :** स्वयंपाकाच्या तेलात ट्रान्स फॅटी ॲसिड असतात जे पुन्हा गरम केल्यावर वाढतात. ट्रान्स फॅट्स हे सॅच्युरेटेड फॅट्सपेक्षा वाईट असतात कारण ते केवळ वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढवत नाहीत तर चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी देखील कमी करतात. यामुळे पार्किन्सन रोग, हृदयरोग, स्ट्रोक, कर्करोग आणि यकृताच्या विविध समस्या उद्भवू शकतात.

■ ■ ■

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## हास्यालंकार

**परिस्थिती येवो**
**कोणतीही**
**मनाला द्यावी शिकवण**
**चेहऱ्यावरील स्माईल भौ**
**कमी होऊ देणार**
**नाही तसूभर**

**सर्व अलंकारात असे**
**हास्यालंकार भारी**
**कुण्याही सराफाच्या**
**दुकानावर**
**मिळेना संसारी ..**

## भिवंडी शहर व ग्रामीण भागात झालेल्या पावसात नदी लगतच्या भागात शिरले पाणी

भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी



भिवंडी शहर व ग्रामीण भागात झालेल्या पावसाने कामवारी नदीची पातळी वाढली असून नदी लगत तर पुढे खाडी लगत क्षेत्रातील अनेक झोपडपट्टी परिसरात पाणी शिरल्याची घटना घडली आहे. शहरातील बाजारपेठ,मंडई,तीनबत्ती,भाजी मार्केट या सह तांडेल मोहल्ला या भागात तर शेलार नदीनाका या परिसरात त्यासोबत खोणी ग्रामपंचायत हद्दीत खाडीपार या भागात झोपडपट्टी मध्ये पाणी शिरले आहे.दरम्यान मंगळवार सकाळ पासून पावसाने उसंत घेतल्याने पाणी पातळी कमी झाल्याने उशिरा पाणी उसरण्यास सुरवात झाली.परंतु तरी सुद्धा खबरदारी म्हणून नदी लगतच्या लोकांना सावधगिरीचा इशारा आपत्कालीन यंत्रणेने दिला आहे.रात्री झालेल्या पावसामुळे नदीनाका नजीकच्या पालिका हद्दीतील म्हाडा कॉलनी येथील काही घरांमध्ये पाणी शिरले तर खोणी ग्रामपंचायत हद्दीतील खाडीपार रसुलबाद परिसरातील खादी किनारी असलेल्या झोपडपट्टीत पाणी शिरल्याने तेथे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. तर शहरातील बाजारपेठेत सुद्धा मोठे नुकसान झाले असून रात्री अनेक दुकानात पाणी शिरल्याने अनेकांचे नुकसान झाले आहे.दरवर्षी पावसाळ्यात कामवारी नदी लगतच्या परिसरात पाणी तुंबण्याची घटना घडत असते महापालिका प्रशासन नेहमी नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यानंतर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत असते.मात्र पावसाळ्याआधी कामवारी नदीतील गाळ काढणे अथवा नदीपात्र मोठे करण्याकडे मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष असते.त्यामुळे येथील खाडी किनारी राहणारे नागरिक व सखल भागातील राहणाऱ्या नागरिकांचे कुटुंब आपला जीव मुठीत धरून वास्तव्य करत असतात.विशेष म्हणजे ज्या ज्या वेळेस पावसाचे पाणी घरात शिरते त्या त्या वेळेस येथील नागरिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असते.मात्र पूरग्रस्त व नुकसानग्रस्त नागरिकांना वेळीच तेथून सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी पालिकेचे तात्पुरते निवारा केंद्र नसल्याने अशाच परिस्थितीमध्ये नागरिकांना राहावे लागत आहे.

# स्मशानभूमी नाही, चितेवर प्लास्टिक धरून अंत्यसंस्कार
## कोचाई बोरमाळ येथील धक्कादायक प्रकार



> आम्हाला मरणानंतरही शांततेने अंत्यसंस्कार करण्याचा अधिकार नाही का?. आमच्या पाड्याला आजतागायत स्मशानभूमी नाही, रस्ते नाहीत, कोणतीच सुविधा नाही. पावसात चिता भिजू नये म्हणून आम्हाला प्लास्टिक धरावे लागते, यापेक्षा मोठी शोकांतिका काय असेल?. दरवेळी निवडणुकीत आश्वासने मिळतात, पण त्यानंतर कोणी फिरकतही नाही. आम्ही माणूस म्हणून जगतोय की नाही, याची तरी खात्री प्रशासनाने करावी.
>
> **- सदानंद चंदू धोडी, ग्रामस्थ (बोरमाळ)**

तलासरी, दि. २५ : प्रतिनिधी

भारताची आर्थिक राजधानी मानल्या जात असलेल्या मुंबईपासून काही तासांच्या अंतरावरील पालघर जिल्ह्यात आजही नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत असल्याचे एक भयावह वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. तलासरी तालुक्यातील कोचाई बोरमाळ ग्रामपंचायत हद्दीतील पारसपाडा येथे स्मशानभूमी नसल्यामुळे भर पावसात प्लास्टिक पकडून मृत महिलेच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या घटनेमुळे स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांचा निष्काळजीपणा आणि असंवेदनशीलतेचा बुरखा फाटला आहे. मूलभूत सुविधांचा प्रचंड अभाव, रस्त्यांची गैरसोय आणि सार्वजनिक ठिकाणांची अनुपलब्धता ही परिस्थिती सध्या अनेक गावपाड्यांमध्ये विदारक स्वरूप धारण करत आहे.

गावात स्मशानभूमी नसल्यामुळे मृत व्यक्तीच्या नातलगांना पावसात चिता भिजू नये म्हणून चितेवर प्लास्टिक धरावे लागत असल्याचे दृश्य जे संवेदनशील मनाला हादरवून टाकणारे आहे. आजही नागरिकांना अंतिम प्रवासासाठीदेखील सन्मानाने निरोप देता येत नाही, ही बाब शासन व प्रशासनाच्या अपयशाची जिवंत साक्ष आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून अकरा वर्षांपूर्वी पालघर जिल्हा अस्तित्वात आला. हेतू हाच की आदिवासी भागात विकासाच्या सुविधा पोहोचाव्यात. प्रत्यक्षात अनेक गावपाडे अजूनही वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते आणि स्मशानभूमीसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत.

याघटनेनंतर अनेक गावात आजही स्मशानभूमी, रस्ता, वीज यांसारख्या प्राथमिक सुविधा गावात उपलब्ध नाहीत, त्यासाठी जबाबदार कोण?. जिल्हा बनवण्यामागील हेतू जर विकासाचा असेल, तर अकरा वर्षांत काय साध्य झाले?. गावपाड्यांच्या विकासासाठी आलेला निधी कुठे जातो?.अशा अमानवीय घटनांनंतरही प्रशासन गप्प का?. स्थानिक लोकप्रतिनिधी फक्त निवडणुकीच्या काळातच गावात का दिसतात?,असे अनेक प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

# चालू बिलासह थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

वसई, दि. २५ : प्रतिनिधी

महावितरणच्या कल्याण परिमंडलात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात लघुदाब वीज ग्राहकांकडील (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) वीजबिल थकबाकीत तब्बल २१० कोटी रुपयांची भर पडली आहे. याव्यतिरिक्त मार्च २०२५ अखेरची २५ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी तसेच जून महिन्यातील १०८ कोटी ७६ लाख रुपयांची चालू थकबाकी वसुलीचे मोठे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. परिणामी थकित वीजबिलाची वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नाही. वीज खंडितची कटू कारवाई टाळण्यासाठी थकीत व चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे. मागील थकबाकी आणि जून महिन्यातील चालू थकीत वीजबिल लक्षात घेता कल्याण परिमंडलातील लघुदाब ग्राहकांकडून ३० जूनपर्यंत ३४४ कोटी रुपये वसूल होणे आवश्यक आहे. यात कल्याण पूर्व आणि पाश्चिम तसेच डोंबिवली विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत ६० कोटी २६ लाख रुपयांचा समावेश आहे. उल्हासनगर एक आणि दोन, कल्याण ग्रामीण व बदलापूर विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल दोन अंतर्गत १०६ कोटी ३५ लाख रुपयांच्या वीजबिलाचा समावेश आहे. वसई व विरार विभागाचा समावेश असलेल्या वसई मंडलातील ग्राहकांकडील १२३ कोटी ४३ लाख तर पालघर मंडलातील ग्राहकांकडील ५३ कोटी ९३ लाख रुपयांचा समावेश आहे. त्यामुळे कल्याण परिमंडलात थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहिम तीव्र करण्यात आली आहे. जून अखेरपर्यंत रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय महावितरणचे WWW.MAHADISCOM.IN हे संकेतस्थळ, ग्राहकांसाठीचे मोबाईल ॲप, विविध पेमेंट वॅलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग मार्फत वीजबिल ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा उपयोग करून थकबाकी, चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा विहित मुदतीत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी कल्याण परिमंडलातील वीज ग्राहकांना केले आहे.

# चार अट्टल दुचाकीचोर पोलिसांच्या जाळ्यात
## दोन अल्पवयीन आरोपी; तीन गुन्ह्यांची उकल

वसई, दि. २५ : प्रतिनिधी



दुचाकी चोरीच्या दोन गुन्ह्याचा तपास करत असलेल्या बोळींज पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने चार अट्टल दुचाकीचोर हाती लागले. त्यातील दोन जण अल्पवयीन असून याटोळीकडून तीन गुन्हयांची उकल करण्यात आली असून त्यातील मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

९ जून २५ रोजी संध्याकाळी विरार पश्चिमेकडील विष्णु पार्क परिसरात उभी केलेली फिर्यादीची दुचाकी चोरट्यांनी चोरून नेली होती. तर १३ जून २० रोजी विरार पश्चिमेकडील अग्रवाल पॅरामाऊंट परिसरातून एक दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात गुन्हयांचा तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक करत होते. पथकाने घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेजचे परिक्षण करत संशयित इमसांचा माग काढत बातमीदारांच्या मदतीने आरोपी निष्पन्न केले. त्यानंतर पथकाने अनुराग सुंदरम आणि मांतेश कोळी (दोघेही राहणार विरार पश्चिम) यांना विरार परिसरातून ताब्यात घेतले.

चौकशीत दोघांनी चोरीची कबुली देतानाच त्यांच्यासोबत आणखी दोन अल्पवयीन मुले असल्याची धक्कादायक माहिती दिली. त्याआधारे पथकाने त्या दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या. याकारवाईत पोलिसांनी केलेल्या चौकशीत आरोपींनी बोळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक तर अर्नाळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपींनी चोरलेल्य तीनही दुचाकी हस्तगत केल्या. याकारवाईत तीन गुन्ह्यांची उकल झाली.

पोलीस आयुक्त मधुकर पांडेय, अतिरिक्त आयुक्त दत्तात्रय शिंदे, उपायुक्त जयंत बजबळे, सहाय्यक पोलीस आयुक्त विजय लगारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे, पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत, उपनिरीक्षक किरण वंजारी, उपनिरीक्षक विष्णू वाघमोडे, सहाय्यक फौजदार जनार्दन मते, किशोर धनु, हवालदार रोशन पुरकर, प्रफुल्ल सरगर, संदीप शेळके, सुखराम गडाख यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## भाजपा मधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर, आमदार आयलानी यांनी मतदारांची माफी मागावी भाजपाच्या माजी अध्यक्षाची मागणी

उल्हासनगर, दि. २५ : प्रतिनिधी

मी सिंधी आमदार असल्याने मला जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचे वक्तव्य भाजपा आमदार कुमार आयलानी यांनी नुकतेच केले असुन ते सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे . त्यांच्या या वक्तव्या ने संतप्त झालेले भाजपाचे माजी जिल्हा अध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी आयलानीने उल्हासनगर मतदारांची माफी मागावी अथवा आमदारकी चा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे. रामचंदानी यांच्या या भूमिके मुळे भाजपा मधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.

भाजपा आमदार कुमार आयलानी यांनी शहाड येथील अंटेलिया येथील उल्हास नदी च्या काठा वर शासकीय निधीतून घाट बांधण्याचे काम सुरु केले आहे . सदर बांधकामाची तक्रार हिराली फाउंडेशन या संस्थे च्या अध्यक्षा सरिता खानचंदानी यांनी लघुपाट बंधारे विभागा कडे केली होती. लघुपाटबंधारे विभागा कडून पाहाणी केल्या नंतर त्यांनी नदी पात्रात बांधकाम होत असल्याचा निर्वाळा देत बांधकाम पाडण्याची नोटीस बजावली होती. या बेकायदेशीर घाट विरोधात सामाजिक संस्थानी जोरदार आवाज उठवल्याने नाराज झालेले आमदार आयलानी यांनी सोशल मीडिया मध्ये आपली नाराजी व्यक्त करताना म्हटले की मी सिंधी आमदार असल्याने मला त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे. एखाद्या मराठी आमदार विरुद्ध यांची बोलण्याची हिमंत होईल का, असा सवाल करीत त्यांच्या विरोधकांना टोला मारला मात्र त्यांच्या या वक्तव्याचा त्यांच्याच पक्षाचे माजी अध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांनी चांगलाच समाचार घेत घर चा आहेर देताना म्हणाले की कुमार आयलानी हे सिंधी मतांच्या नव्हे तर उल्हासनगर च्या सर्व समाजातील मतदारांनी त्यांना मतदान केले आहे ते भाजपा चे आमदार म्हणून निवडून आले आहे. त्यांनी केलेले व्यक्तव्य आक्षेपार्य आहे. त्यांनी तातडीने नें मतदारांची माफी मागावी अन्यथा त्यांनी आमदारकी चा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे .दरम्यान रामचंदानी यांच्या या भूमिके वरून भाजप मधील अंतर्गत वाद आता चव्हाट्या वर आले आहेत. दुसरीकडे कुमार आयलानी यांचे कट्टर विरोधक समजले जाणारे माजी आमदार पप्पू कलानी यांचे समर्थक कमलेश निकम यांनी आयलानी यांच्या कामकाजावर निशाणा साधत त्यांना अयशस्वी आमदार असल्याची टीका केली आहे. या बाबत कुमार आयलानी हे अद्याप मौन पाळून आहेत योग्य वेळ आले वर बोलेन असे सांगितले जात आहे.

## उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीसाठी 50 कोटी मंजूर
## खा. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

उल्हासनगर, दि. २५ : प्रतिनिधी

कल्याण लोकसभा मतदारसंघातील उल्हासनगर महापालिका मुख्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा झाला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे राज्याच्या नगरविकास विभागाने उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीसाठी पहिल्या टप्प्यात ५० कोटींचा निधी मंजूर केला आहे. महापालिका क्षेत्रात मुलभूत सोईसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद म्हणून हा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा निधीचा पहिला टप्पा असून यापुढेही निधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे उल्हासनगर महापालिकेची प्रशासकीय इमारतीची उभारणी करता येणार आहे.

उल्हासनगर शहर हे लहान मोठ्या उद्योगांचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. उल्हासनगर शहर हे ठाणे जिल्ह्यातील एक मोठी घाऊक आणि किरकोळ वस्तुंच्या खरेदी विक्रीची बाजारपेठ आहे. त्यामुळे शहरात दररोज हजारो व्यापारी, ग्राहक येत जा करत असतात. या शहराला सुविधा पुरवण्याचे काम उल्हासनगर महापालिकेच्या माध्यमातून केले जाते. उल्हासनगर शहरात विविध सुविधा पुरवण्यासाठी स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे प्रयत्नशील असतात. त्यांच्या माध्यमातून शहरात सध्या विविध विकासकामे सुरू आहेत. यात कॉंक्रीट रस्ते, भुयारी गटार योजना, मैदान, उद्यान विकास, क्रीडा संकूल, रूग्णालय विकास केला जात आहे. याच उल्हासनगर महापालिकेची प्रशासकीय इमारत गेल्या काही वर्षात जीर्ण झाली असुन अनेकदा स्लॅबचे प्लास्टर कोसळणे अशा घटना उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीत समोर आल्या होत्या. त्यासाठी भरघोस निधीची गरज होती. स्थानिक शिवसेनेचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांच्याकडे निधीची मागणी केली होती. त्यानुसार राज्याच्या नगर विकास विभागाच्या माध्यमातून उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी ५० कोटी रूपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उल्हासनगर महापालिकेची प्रशासकीय इमारत भव्य उभारावी अशा सूचना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पालिका प्रशासनाला दिल्या आहेत. तसेच हा निधीचा पहिला टप्पा आहे. येत्या काळात टप्प्याटप्याने इमारतीच्या उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले आहे.

# साहित्य चावडीवर व्यसनमुक्तीचा संदेश

वसई, दि. २५ : प्रतिनिधी



प्रत्येक महिन्यात साहित्यिक मेजवानी मिळावी यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'साहित्य चावडी' या उपक्रमाचा आठवा वर्धापनदिन नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी चावडीवर व्यसनमुक्ती, संस्कार आणि जीवनमूल्यांचा संदेश देण्यात आला.

वसई, विरार भागातील नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी यंग स्टार्सचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर व समन्वयक अजीव पाटील यांच्या संकल्पनेतून साहित्य चावडी या उपक्रमाची आठ वर्षांआधी सुरुवात करण्यात आली होती. त्याचा आठवा वर्धापनदिन नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्ष हितेंद्र ठाकूर उपस्थित होते.


आजच्या सोशल मीडियाच्या युगात हवी तशी कविता एआय उत्पादित करू शकते. त्यासाठी तो कवी असण्याची गरज राहिली नाही. मनातल्या भावना, संवेदना, दुःख आजुबाजुच्या आक्रोश अन्याय, अत्याचार, अनाचार, फसवणूक याबाबत मनातल्या संवेदना जेव्हा शब्दातून कागदावर उमटताच ते खरे साहित्य, असे प्रतिपादन कोमसाप पालघर जिल्हा अध्यक्ष व चावडीचे अध्यक्ष प्रवीण दवणे यांनी केले.

विक्रांत केसरकर यांनी साहित्य चावडीच्या ७० व्या पुष्पपर्यंत आढावा घेत प्रस्तावना सादर केली. अफजल खान वधाचा पोवाडा माधवी पवार या विद्याथ्र्यांनीने सादर केला. तर प्रा. जगदीश संसारे रेडिओ जॉकी लिखित व दिग्दर्शित व्यसन मुक्तीवर आधारित नाटिका सेंट जोसेफ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. यामधून व्यसनमुक्तीचा संदेश तरुणांना दिला. प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री डॉ. पल्लवी बनसोडे, प्रा.जगदिश संसारे, वसई जनता बँकचे अध्यक्ष महेश देसाई, समन्वयक अजीव पाटील उपस्थित होते. माजी नगरसेविका रिटा सरवैया व सीमा पाटील यांनीही शुभेच्छा पत्र भेट दिली. पहिल्या सत्राचे नीटनेटके सुत्रसंचलन प्रा. कविता पाटील यांनी केले. तर मधुकर तराळे यांनी ऋण केले.

दुसऱ्या सत्रात जेष्ठ कवी .वर्जेश सोलंकी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या हास्य कविसंमेलनात ५५ कवींनी आपल्या रचना सादर केल्या. डोंबिवली, मुंबई, पालघर, वसई. विरार येथील साहित्यिक यात सहभागी झाले होते. कवी संमेलनाचे सुत्रसंचलन शिल्पा परुळेकर पै, स्मरणा शेट्ये, शुभम पाटील यांनी केले. तर आभार सुरेखा कुरकुरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपाली जाधव, राजेश बक्षी, कुमुद शहाका,र मानसी शिगवण, हरिश्चंद्र मिठबावकर यांच्यासह चावडी परिवार यांनी मेहनत घेतली.

## स्वखर्चातून घर दुरुस्त करुन देणार-प्रकाश निकम यांचा मदतीचा हात

मोखाडा, दि. २५ : प्रतिनिधी



वेळेत उपचार व ॲम्ब्युलन्स न मिळाल्याने एका आदिम कुटूंबातील नवजात बालकाला आपला प्राण गमवावा लागल्याची दुर्दवी घटना मोखाड्यात घडली. यामध्ये आणखीन संवेदनाहिन कारभार म्हणजे मातेला व मृत अभर्काला घरी आण्यासाठी रुग्णवाहिका न दिल्याने बसने 80 किमी प्रवास करून घर गाठावे लागले या घटनेने संपूर्ण राज्यात पडसाद उमटले होते.

यापिडित कुटुबाची पालघर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम यांनी भेट घेऊन सांत्वन केले. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या कुटूंबाची परिस्थिती हलाखीची असून पावसामुळे संपूर्ण घर गळत असल्याने स्वखर्चातून घर दुरुस्त करून देणार असल्याने निकम यांनी यावेळी सांगितले

मोखाडा तालुक्यातील जोगलवाडी येथील अविता कवर या महिलेच्या पोटात 11 जूनला पहाटे 3 वाजता पोटात दुखायला लागले. 108 आणि 102 या दोन्ही रुग्णवाहीका उपलब्ध न झाल्याने, अखेर दुपारी 12 वाजता खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात खाजगी वाहनाने दाखल केले होते. तेथेही रुग्णवाहिका उपलब्ध होण्यास दोन ते तीन तासांचा कालावधी लागला. त्यानंतर मोखाडा आणि तेथून नाशिक असा उपचार मिळवण्यासाठी अविता कवर या मातेला तब्बल 15 तासांचा कालावधी लागला.

नाशिकच्या सरकारी रुग्णालयात पोटातील मृत अर्भक बाहेर काढल्यानंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्याची व्यवस्था नव्हती. तेव्हा तिचा पती अर्भक पिशवीतून घेऊन नाशिकहून मोखाडा येथे आला. इतकेच नाही तर अवितालाही घरी येण्यासाठी रुग्णवाहिका न मिळाल्याने तिही एसटी बसने मोखाड्याला आली होती. याघटनेने आरोग्य विभागावर चांगलीच टीकेची झोड उठली होती.

## महापालिका शाळेतील मुलांना रेनकोटचे वितरण



भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी

भिवंडी शहरातील धामणकर नाका येथील कामगार वस्तीतील मुले शिक्षण घेत असलेल्या पालिका शाळा क्रमांक ३० येथील प्राथमिक शाळेतील १५० विद्यार्थ्यांना स्थानिक माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या वतीने रेनकोट वितरण करण्यात आले. या शाळेत परिसरातील कामगार कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.या विद्यार्थ्यांना पालिकेच्या वतीने देण्यात आलेले गणवेश बुट हे सुद्धा वितरित करण्यात आले. यावेळी संतोष शेट्टी यांनी या गरजू विद्यार्थ्यांसाठी संगणक कक्ष बनवून देणार असल्याची घोषणा केली.

# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

## महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या.

पत्ता - सीटीसी क्र.119/बी, प्रमिला अपार्टमेंट, तिसरा मजला, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - 16

### जाहीर समन्स

वादी : **माणिकपूर अर्बन को ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड,** सोविनेयर अपार्टमेंट, माणिकपूर चर्च रोड, माणिकपूर नाका, वसई (प), जि. पालघर, यांनी मा. सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा), महाराष्ट्र राज्य सह. पत. फेडरेशन मर्या. जि. पुणे या कार्यालयाकडे संस्थेच्या थकबाकीदार व त्यांचे सर्व जामीनदार यांच्याविरुध्द **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101** अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी दावे दाखल केलेले आहेत. या सर्व थकबाकीदार व त्यांचे जामीनदार यांना त्यांचे म्हणणे मांडणेसाठी संधी देऊन दि. २८/०५/२०२५ व दि. ११/०६/२०२५ रोजी **सहा. निबंधक सह. संस्था (परसेवा) पुणे शहर व्दारा माणिकपूर अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. माणिकपूर नाका, वसई (प),** या मुख्य कार्यालयात सुनावणीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु खालील कर्जदार / जामीनदार यांना वेळोवेळी सुनावणी नोटीस दिलेल्या पत्त्यावर आर.पी.ए.डी.व्दारे पाठवूनही ते सुनावणीस हजर राहिलेले नाहीत. आता त्यांना शेवटची संधी देऊन त्यांचे म्हणणे मांडणेसाठी **मा. सहा निबंधक, सह. संस्था (परसेवा), पुणे शहर, द्वारा माणिकपूर अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.** माणिकपूर नाका, वसई (प), या मुख्य कार्यालयात **दि.०२/०७/२०२५ वार बुधवार रोजी दुपारी २.३० वाजता** सुनावणीसाठी बोलविण्यात येत आहे. ते याहीवेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास त्यांचे सदरील दाव्याबाबत काहीएक म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांचेविरुध्द वसुली प्रमाणपत्राबाबतचा दावा निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रतिवादी**


| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार नाव | पत्ता | दावा क्रमांक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | **कर्जदार** -मिलिंद सदानंद तावडे<br>**जामिनदार नं २-** दिपक धर्मवीर लोहात | **कर्जदार पत्ता** -रूम नं.४, मलकाई माता सोसायटी, जरी मरी मंदिर जवळ, उमेळमान, वसई (प), पिन ४०१२०२.<br>**जामिनदार नं २ पत्ता-** बरामपूर, बी.के.एस. स्कूल मागे, माणिकपूर, वसई (प), पिन ४०१२०२ | ४७४ | ५,४५,८८६ /- |
| ०२ | **कर्जदार** -सचिन पोपट ताटे<br>**जामिनदार नं १-** विलास हनुमंत शेडगे<br>**जामिनदार नं २-** अभिजित नवनीत रुमडे | **कर्जदार पत्ता** -बी/२०१, किशोर कुंज, बिल्डींग नं.१, विवा कॉलेज जवळ, वाय. के. नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३<br>**जामिनदार नं १ पत्ता-** बी/३०४, साई सिद्धी बिल्डींग, तांदूळ बाजार जवळ, विरार (पु), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५<br>**जामिनदार नं २ पत्ता-** बी/१०१, महेश स्मृती, चिखल डोंगरी रोड, राम मंदिर जवळ, डोंगरपाडा, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३ | ४७५ | १,४६,५५१/- |
| ०३ | **जामिनदार नं १-** मंगेश मनोहर मेहेर | **जामिनदार नं १ पत्ता-** घर नं., ७९, टेम्बीपाडा, शनी मंदिर जवळ, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१ | ४७६ | १,०२,२८८/- |
| ०४ | **कर्जदार** -साजिद गफूर शेख<br>**जामिनदार नं १-** कैलास अनिल भालेराव | **कर्जदार पत्ता** -बंदरवाडा, बोळींज, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३<br>**जामिनदार नं १ पत्ता-** सम्राट अशोक नगर, बोळींज, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३ | ४७७ | ९३,२००/– |
| ०५ | **कर्जदार** -सद्दाम मकबूल कूरेशी<br>**जामिनदार नं १-** जेरोम जॉन डिमेलो<br>**जामिनदार नं २-** मकसूद मुन्शी कूरेशी | **कर्जदार पत्ता** - "मेरे रब का फझर", आगाशी रोड, आगाशी पोलीस स्टेशन जवळ, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१<br>**जामिनदार नं १ पत्ता-** ३३७/१२–३, प्रतीक्षा, अर्नाळा–वसई मार्ग, दोनतलाव, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१<br>**जामिनदार नं २ पत्ता-** बंगला नं.३६, आगाशी रोड, आगाशी पोलीस स्टेशन जवळ, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१ | ४७८ | १,१५,२६४/– |
| ०६ | **कर्जदार** -फरीदा मकसूद कूरेशी<br>**जामिनदार नं १-** मकसूद मुन्शी कूरेशी<br>**जामिनदार नं २-** सद्दाम मकबूल कूरेशी | **कर्जदार पत्ता** -बंगला नं.३६, आगाशी रोड, आगाशी पोलीस स्टेशन जवळ, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१<br>**जामिनदार नं १ पत्ता-** बंगला नं.३६, आगाशी रोड, आगाशी पोलीस स्टेशन जवळ, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१<br>**जामिनदार नं २ पत्ता-** -"मेरे रब का फझर", आगाशी रोड, आगाशी पोलीस स्टेशन जवळ, आगाशी, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०१ | ४७९ | ६९,४५६ /– |
| ०७ | **जामिनदार नं १-** मुद्दसर सिकंदर पटेल | **जामिनदार नं १ पत्ता-** डी/२०१, यशोधन अपार्टमेंट, विरार आगाशी रोड, बोळींज, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३ | ४६९ | ४,३२,३४०/– |
| ०८ | **कर्जदार** -कार्तिक कमलेश वैयाता<br>**जामिनदार नं १-** महेश जगदीश राठोड<br>**जामिनदार नं २-** संजय रसिकलाल रावल | **कर्जदार पत्ता** -प्लॅट नं ४, बिल्डींग नं.१३, रणवाल विहार, बोळींज, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३<br>**जामिनदार नं १ पत्ता-** प्लॅट नं २, बिल्डींग नं.१३, रणवाल विहार, बोळींज, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३<br>**जामिनदार नं २ पत्ता-** सी/१०२, लिली अपार्टमेंट, यशवंत नगर, विरार (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३ | ४६७ | २९,२६,१५४/– |
| ०९ | **कर्जदार** -बिरजू झिंकू शर्मा<br>**जामिनदार नं २-** शरीफ बशीर शेख | **कर्जदार पत्ता** -घर नं. ६८०/१०, शिवनगर, गोडाऊन जवळ, पाचूबंदर रोड, वसई रोड (प). ता.वसई. जि.पालघर ४०१ २०१<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रूम नं.०३, म्हात्रेवाडी, गावठाण रोड, विरार(प) ता. वसई. जि.पालघर. पिन ४०१ ३०३ | ४६६ | २,२३,०४५ /– |
| १० | **कर्जदार** -विजय मुरलीधर नरळे<br>**जामिनदार नं १-** अनिल धोंडू खोपकर<br>**जामिनदार नं २-** महेश रीतलाल शाहू | **कर्जदार पत्ता** -घर नं.२०८४, प्लॉट नं.२३, शिगाव रोड, धनानी नगर, सरावली, पालघर बोइसर, ता.पालघर जि.पालघर. पिन ४०१ ५०१<br>**जामिनदार नं १ पत्ता-** ३२५/२५, गणेश कृपा चाळ, सेन्ट्रल पार्क रोड, ओम नगर जवळ, ओस्तवाल नगरी, नालासोपारा (पू) ता. वसई. जि.पालघर. पिन ४०१ २०९<br>**जामिनदार नं २ पत्ता-** सर्वे नं. ४७, हौ.नं.०३, भागवत टेकडी, पांढरी पाडा, दुर्गा मंदिराजवळ, धानीव नालासोपारा (पु) ता. वसई. जि.पालघर. पिन ४०१ २०९. | ४६५ | २,९४,४६० /– |
| ११ | **कर्जदार** -बाबाराम विठ्ठल जाधव<br>**जामिनदार नं २-** राजेश मोहन यादव | **कर्जदार पत्ता** -सर्वे नं. १८१, जिजामाता हौ सोसा., सीताराम नगर, जिल्हा परिषद शाळासमोर, विकास नगर, संतोष भवन, नालासोपारा (पु) ता.वसई. जि.पालघर ४०१ २०९<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रु.नं.३२६१, धोडी पुजा, नवापूर रोड, सरावली. ता.पालघर जि.पालघर. पिन ४०१ ५०१ | ४६३ | १,९९,१६९ /– |
| १२ | **कर्जदार** -बंशबहादूर रामकुमार जयस्वाल<br>**जामिनदार नं १-** संतोष उत्तम अहिरे<br>**जामिनदार नं २-** स्वप्नील जयवंत पाटील | **कर्जदार पत्ता** -रु. नं.२५६, नित्यानंद चाळ, नायगाव कोलीवाडा नायगाव (प) ता.वसई. जि.पालघर. पिन ४०१ २०७<br>**जामिनदार नं १ पत्ता-** रु.नं.०३, संत रोहिदास चाळ कमिटी, तांडा पाडा रोड, सर्वोदय जवळ, संतोष भवन, नालासोपारा (पु) ता.वसई. जि.पालघर. पिन ४०१ २०९.<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रु. नं.202, सीताराम बाप्पा अपार्टमेंट, पाच पायरी रोड, विरार (पु) ता.वसई जि.पालघर ४०१ ३०५ | ४६२ | २,७८,१२० /– |
| १३ | **जामिनदार नं १-** नवीनकुमार दयाराम गुप्ता | **जामिनदार नं १ पत्ता-** रु.नं. बी/०४, विनय निवास, मनवेल पाडा रोड, टेपाचा पाडा, मनवेल पाडा, विरार (पू). ता.वसई. जि.पालघर. पिन ४०१ ३०५ | ४६१ | २,२४,९७१ /– |
| १४ | **कर्जदार** -सुदाम बिसन जाधव<br>**जामिनदार नं १-** दिलीप गजानन भोईर<br>**जामिनदार नं २-** अशोक गंगाराम कदम | **कर्जदार पत्ता** -मातृ श्रेया अपार्टमेंट, कबुतर खाना, झेंडा बाजार, वसई (प). ता. वसई. जि. पालघर. पिन ४०१ २०१<br>**जामिनदार नं १ पत्ता-** पाणजूगाव, नायगाव (प) ता. वसई. जि.पालघर. पिन ४०१ २०७<br>**जामिनदार नं २ पत्ता-** मु.भाटपाडा पो. चंदनसार, विरार (पु) ता. वसई जि. पालघर ४०१ ३०५ | ४६० | १,५५,२५७/– |
| १५ | **कर्जदार** -रामधन प्रभू तिडके<br>**जामिनदार नं १-** अविनाश वसंत पोकळे<br>**जामिनदार नं २-** अरविंद मेवालाल पटेल | **कर्जदार पत्ता** -हाउस नं. १३१७ , रेड्डी निवास, चंदनसार रोड, गडगापाडा, विरार (पू) ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५<br>**जामिनदार नं १ पत्ता-** ठाकूर चाल, निळेमोरे, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०३.<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रूम नं. २ केशव अपार्टमेंट, चंदनसार रोड, विरार (पू) ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५ | ४५९ | १,८८,५७८ /– |
| १६ | **जामिनदार नं १-** प्रविण सदशिव पुजारी | **जामिनदार नं १ पत्ता-** बी/२०४, मंगल अपार्टमेंट, चंदनसार रोड, विरार (पूर्व), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५ | ४५८ | ६,६६,७३५ /– |
| १७ | **कर्जदार** -निलेश मुरलीधर गोवारी<br>**जामिनदार नं १-** भरत धर्माजी घरत<br>**जामिनदार नं २-** प्रविण भास्कर घरत | **कर्जदार पत्ता** -४२३, गोवारी पाडा, कळंब लास्ट स्टॉप, कळंब, निर्मल, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०४<br>**जामिनदार नं १ पत्ता-** बुधाजी स्टॉप, मु. पो. कळंब, निर्मल, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०४<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रानभाग, मु. पो. कळंब, निर्मल, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१३०४ | ४५७ | १,२७,७५३ /– |
| १८ | **जामिनदार नं १-** वैभव चंद्रकांत देऊळकर<br>**जामिनदार नं २-** मिलिंद किसन पाटील | **जामिनदार नं १ पत्ता-** ए/४०६, भावेश कमर्शियल कॉम्प्लेक्स, श्रीपस्थ, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०३<br>**जामिनदार नं २ पत्ता-** ए/२०२, मातृधाम अपार्टमेंट, स्टेशन रोड, नालासोपारा समेल पाडा, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०३ | ४५६ | १७,७२,८८१/– |
| १९ | **जामिनदार नं १-** प्रशांत परशुराम घरत<br>**जामिनदार नं २-** सुरेंद्र शांताराम सावंत | **जामिनदार नं १ पत्ता-** सर्वे नं. १४४/8 राजसुख हॉस्पीटल समोर, बिलालपाडा नालासोपारा (पू) ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१२०९<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रूम नं. ३१२, मनवेल पाडा, कारगिल नगर, विरार (पू) ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१३०५ | ४५५ | २,९५,८५०/– |
| २० | **कर्जदार** -लेस्ली बॉप्टीस्टा रॉडीग्ज / सबिना बॉप्टीस्टा रॉडीग्ज / पाकीबाई बापतिस्त रॉड्रीग्स<br>**जामिनदार नं १-** जॉयसन जेरोम ब्रास<br>**जामिनदार नं २-** रुबन शान्तियागो डीमोन्ते | **कर्जदार पत्ता** -रानेभाट, नाळा, पो.सोपारा, नालासोपारा (प), ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१३०२<br>**जामिनदार नं १ पत्ता-** जेलांडी–वटार, पो. आगाशी, विरार (प), ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३<br>**जामिनदार नं २ पत्ता-** मेढे–वटार, पो. आगाशी, विरार (प), ता.वसई, जि. पालघर, पिन ४०१३०३ | ४५४ | ३५,८७,३००/– |
| २१ | **कर्जदार** -किशोर शशी दवे<br>**जामिनदार नं १-** संदिप अरुण शर्मा<br>**जामिनदार नं २-** अजय शिवकुमार गुप्ता | **कर्जदार पत्ता** -ए/१०३, विजय विहार कॉम्प्लेस, एव्हरशाईन सिटी, वसई (पु), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०८<br>**जामिनदार नं १ पत्ता-** ए/२, साई सिद्धी अपार्टमेंट, वसंत नगरी, वसई (पु), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०८<br>**जामिनदार नं २ पत्ता-** रूम नं . १०१, पहिला मजला, स्मिता अपार्टमेंट, आचोळे रोड, नालासोपारा (पु), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०९ | ४५३ | ५७,०३,९५५/– |
| २२ | **जामिनदार नं २-** मयूर देवशंकर मेहता | **जामिनदार नं २ पत्ता-** बी/६०१, रश्मी रेजेन्सी, न्यू लिंक रोड, नालासोपारा (पु), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०९ | ४५२ | ९,३०,७७७/– |
| २३ | **जामिनदार नं १-** निशांत बाळकृष्ण पाटील | **जामिनदार नं १ पत्ता-** भंडारआळी, वसई गाव, झेंडा बाजार रोड, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०१ | ४५१ | ११,८७,७७४/– |
| २४ | **कर्जदार** -अन्नामारीया जॉन मंडळ<br>**जामिनदार नं १-** जॉन सशांक मंडळ<br>**जामिनदार नं २-** राजेंद्र मोहनलाल जैन | **कर्जदार पत्ता** –बी/२१/०६, वास्तू, लाभ कॉम्प्लेक्स, अंबाडी रोड, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२.<br>**जामिनदार नं १ पत्ता-** बी/२१/०६, वास्तू, लाभ कॉम्प्लेक्स, अंबाडी रोड, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२.<br>**जामिनदार नं २ पत्ता-** ए/२०१, सुंदरवन, वसंत कृष्णा, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२ | ४५० | १,५८,८८३/– |
| २५ | **जामिनदार नं २-** सुनिता रतन बनसोडे | **जामिनदार नं २ पत्ता-** ए–२०२, धूप छाव, अंबाडी रोड, साई गार्डन, कृष्णा टाऊनशिप,वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२. | ४४८ | २१,२१,४०९/– |
| २६ | **जामिनदार नं १-** सिराजखाँ कादरखाँ पठाण | **जामिनदार नं १ पत्ता-** इंद्रा वसाहत, शांती नगर, साई बाबा मंदिर जवळ, पल्हार, वसइ (पूव), ता. वसइ, जि. पालघर, पिन ४०१ २०८. | ४४६ | २२,१३,६३४/– |
| २७ | **जामिनदार नं १-** हिंमत किसन राठोड | **जामिनदार नं १ पत्ता-** बी–६, अशोक अपार्टमेंट, फादरवाडी, गोखिवरे, वसई (पूर्व), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०८ | ४४५ | २९,१०,९८७/– |
| २८ | **जामिनदार नं २-** धनंजय जयवंत राऊत | **जामिनदार नं २ पत्ता-** घर नं.१२, भंडारआली. पापडी, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२. | ४४४ | ४४,४२,६८८/– |
| २९ | **जामिनदार नं १-** आलेक्स पीटर डायस<br>**जामिनदार नं २-** अँन्स्लीम मोजेस परेरा | **जामिनदार नं १ पत्ता-** नागलन वाडी, बदामी स्टॉप, गिरिज, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२<br>**जामिनदार नं २ पत्ता-** मोठे गिरिज, गोरेटी सेसिल परेरा मार्ग, वसई (प), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०२. | ४४३ | ७,७१,६९४/– |

शिक्का

**( हर्षित वसंतराव तावरे )**

मा. सहा निबंधक सह. संस्था(परसेवा)

म.राज्य सह.पतसंस्था फेडरेशन मर्या.,पुणे



# सेन्सेक्समध्ये 700 अंकांची वाढ तर निफ्टी 25,244च्या स्तरावर बंद

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

बुधवारी शेअर बाजारात वाढ पाहायला मिळाली. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी ५० हे हिरव्या चिन्हावर बंद झाले. दुसरीकडे मिडल ईस्टमधील परिस्थिती सामान्य होत असल्याचे दिसून आले असून त्याचा फायदा भारतीय शेअर बाजाराला होताना दिसत आहे.

बुधवारी सेन्सेक्सने ८२,४४८ च्या स्तरावर सुरुवात केली होती आणि दिवसाच्या शेवटी ०.८५ टक्क्यांच्या वाढीसह ८२,७५५ च्या स्तरावर बंद झाला. दुसरीकडे निफ्टी ५० ने २५,१५० वर सुरुवात केली आणि दिवसअखेर ०.८० टक्क्यांच्या वाढीसह २५,२४४ च्या स्तरावर बंद झाला.

बीएसई मिडकॅप निर्देशांक आणि स्मॉलकॅप निर्देशांकातही वाढ झाली. बीएसई स्मॉलकॅप निर्देशांकात १.५९ टक्क्यांची वाढ झाली, तर मिडकॅप निर्देशांकात ०.६३ टक्क्यांची वाढ झाली.

या कालावधीत बीएसईवर लिस्टेड कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सत्रातील ४५० लाख कोटी रुपयांवरून सुमारे ४५४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले. यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसात ४ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० च्या टॉप गेनर्समध्ये टायटन कंपनीचा शेअर सर्वात पुढे राहिला, ज्यामध्ये ३.५८ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर इन्फोसिसमध्ये २.११ टक्क्यांची वाढ, महिंद्रा ॲण्ड महिंद्रामध्ये २.०८ टक्क्यांची वाढ, ग्रासिम इंडस्ट्रीजमध्ये १.८४ टक्क्यांची वाढ आणि जेएसडब्ल्यू स्टीलमध्ये १.७४ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० च्या टॉप लूजर्समध्ये सर्वात जास्त नुकसान भारत इलेक्ट्रॉनिक्सला झाले, जो २.९८ टक्क्यांनी घसरला. कोटक बँकेत

**सेन्सेक्स 82,755**
**निफ्टी 25,244**

१.२४ टक्क्यांची घसरण, आयशर मोटर्समध्ये ०.९५ टक्क्यांची घसरण, ओएनजीसीमध्ये ०.८३ टक्क्यांची घसरण आणि ॲक्सिस बँकेत ०.६५ टक्क्यांची घसरण झाली.

जरी सर्व सेक्टोरल निर्देशांक हिरव्या चिन्हावर बंद झाले, तरी निफ्टी इंडिया डिफेन्स निर्देशांक सर्वात जास्त म्हणजे २ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर निफ्टी प्रायव्हेट बँक देखील ०.०३ टक्क्यांनी घसरला.

टॉप परफॉर्मर निफ्टी मीडिया राहिला, जो १.९९ टक्क्यांनी वाढला. त्यानंतर निफ्टी आयटीमध्ये १.६४ टक्क्यांची वाढ, निफ्टी इंडिया कंझ्युमरमध्ये १.२२ टक्क्यांची वाढ, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये १.०३ टक्क्यांची वाढ, निफ्टी ऑटोमध्ये ०.९७ टक्क्यांची वाढ, आणि निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.७४ टक्क्यांची वाढ झाली.

## दैनिक महासागर आणि मुक्तछंद साहित्य समूह आयोजित आषाढ मास महाकाव्य स्पर्धा

**सहभागी व्हा आणि जिंका रोख रकमेची बक्षीसे**

**मुंबई दि. २५ प्रतिनिधी**

महाकवी कालिदास यांच्या **'आषाढस्य प्रथम दिवसे'** हा चरण अत्यंत सुप्रसिद्ध आहे. महाकवी कालिदास यांनी मेघदूत या महाकाव्याची रचना करताना त्यात आषाढ महिन्यातील सृष्टीचं वर्णन केले आहे. आषाढ महिन्याचा पहिला दिवस कवी कालिदास दिन म्हणून साजरा केला जातो. कवी कालिदासांच्या मेघदूत या महाकाव्यात आषाढ महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचे औचित्य साधून **दैनिक महासागर** आणि **मुक्तछंद साहित्य समूह** यांच्या वतीने एका ऑनलाइन महाकाव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या महाकाव्य स्पर्धेचे संयोजन **मुक्तछंद समूहाचे** प्रशासक आणि **दैनिक महासागर**चे मुख्य वृत्त संपादक गजानन तुपे यांनी केले आहे. या स्पर्धेत स्पर्धकांसाठी पारंपरिक आणि नवकाव्य प्रकारातील काव्य लेखन, सादरीकरण यासारख्या विविधांगी पद्धतीच्या स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. स्पर्धेच्या अंतिम फेरी अखेर सर्वाधिक गुणांनी विजेत्या ठरणाऱ्या स्पर्धकांना प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक आणि उत्तेजनार्थ अशा स्वरूपात एकूण ७००७/- रुपयांची रोख रकमेची बक्षिसे आणि ऑनलाईन सहभाग प्रमाणपत्र या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना दिली जाणार आहेत. ही स्पर्धा विनाशुल्क असून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक कवी आणि कवयित्रींनी **9137362297** या क्रमांकावर संपर्क करावा. शनिवार २८ जून २०२५ ही स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख आहे. २८ जून रोजी रात्री अकरा वाजेपर्यंत येणाऱ्या स्पर्धकांनाच स्पर्धेत सहभागी होता येईल, असे संयोजकांनी कळवले आहे.

## घरात घुसून सेल्फी काढत विनयभंग शेतकऱ्याच्या मुलीने केली आत्महत्या

**वाशिम, दि. २५ प्रतिनिधी**

जिल्ह्यातून एक संतापजनक घटना समोर आली आहे, शेतकऱ्याच्या घरात एकटी मुलगी पाहून घरात घुसून तिच्यासोबत सेल्फी काढत तिचा विनयभंग करण्यात आला. तसेच, लग्नाची मागणी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या युवकाच्या त्रासाला कंटाळून ११ वीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीने चक्क विष प्राशन करत आपलं जीवन संपवल. अल्पवयीन तरुणीने विष प्राशन केल्यानंतर तिला तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना वाशिमच्या शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वाघळूद गावात घडली आहे. याप्रकरणी, आरोपी फरार असून पोलिसांकडून तांत्रिक माहितीच्या आधारावर त्याचा शोध घेतला जात आहे. एकतर्फी प्रेमातून घडलेल्या वाघळूद गावातील घटनेवरुन ग्रामस्थांमधून संताप व्यक्त करण्यात येत असून तालुक्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी टवाळखोर आरोपी अभिषेक देशमुख विरुद्ध शिरपूर पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अभिषेक देशमुख ह्या घटनेनंतर फरार झाला असून शिरपूर पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. दरम्यान, घडलेल्या घटनेमुळे वाशिम जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. मृत अल्पवयीन मुलीच्या पीडित कुटुंबातील सदस्यांनी आरोपीला तात्काळ अटक करुन आम्हाला न्याय देण्याची मागणी केली आहे. अन्यथा, न्यायासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारू अशी भूमिका पीडितेचे नातेवाईक विलास आवटे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

## झाडांना पाणी घालताना स्कायवॉकचा स्लॅब तुटला
### १४व्या मजल्यावरून पडून निवृत्त एसबीआय मॅनेजरचा मृत्यू

**फरीदाबाद, दि. २५ वृत्तसंस्था**

हरियाणातील फरीदाबाद येथे एका बहुमजली इमारतीच्या १४व्या मजल्यावरून स्कायवॉकचा स्लॅब कोसळून निवृत्त एसबीआय बँक मॅनेजरचा जागीच मृत्यू झाला. इमारतीत राहणाऱ्या इतर लोकांनी पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून कारवाई केली आणि मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी ताब्यात घेतला. मॅनेजरच्या कुटुंबाचे म्हणणे आहे की ते टॉवर्समधील स्कायवॉकवर असलेल्या झाडाच्या कुंड्यांना पाणी घालत होते. या दरम्यान ते आपला तोल गमावून खाली असलेल्या पुलावर कोसळले. ज्यामुळे शरीराचे दोन तुकडे झाले. कुलवंत सिंग ( ७४) असे त्यांचे नाव आहे. ते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये व्यवस्थापक पदावरून निवृत्त झाले होते. सध्या सेक्टर-88 च्या आरपीएस सोसायटीमध्ये त्यांचा मुलगा, सून आणि नातवंडांसह राहत होते.



कुटुंबाकडून मिळालेल्या माहितीनुसार, कुलवंत यांचे कुटुंब आरपीएस सोसायटीच्या टॉवर-८ मध्ये १४ व्या मजल्यावर राहते. त्यांच्या मजल्यापासून एका टॉवरपासून दुसऱ्या टॉवरपर्यंत एक लोखंडी पूल (स्कायवॉक) आहे, ज्यावर झाडांच्या कुंड्या ठेवल्या आहत. त्या कुंड्यांमध्ये पाणी घालत असताना गंजलेल्या भागावर पाय ठेवला, ज्यामुळे त्यांचा तोल गेला. ते वरच्या पुलावरून थेट खालच्या पुलावर पडले, ज्यामुळे त्यांच्या शरीराचे दोन तुकडे झाले. सोसायटीतील लोकांनी सांगितले की ज्या वेळी हा अपघात झाला तेव्हा कुटुंबातील इतर सदस्य फ्लॅटमध्ये उपस्थित होते. त्यांना या अपघाताची कोणतीही माहिती नव्हती. अपघातावेळी खाली उतरणाऱ्या लोकांनी कुलवंतला पडताना पाहिले. त्यानंतर घटनास्थळी गर्दी जमली आणि त्यांनी मुलाला माहिती दिली. माहिती मिळताच वृद्धाचा मुलगा आणि सून खाली आले. त्यांनी पोलिसांना या प्रकरणाची माहिती दिली. त्यानंतर, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठवला.

## आता देशातच होणार रेअर अर्थ मॅग्नेटचे उत्पादन

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

चीनने भारताला रेअर अर्थ मॅग्नेट्स देण्यास नकार दिलाय. यानंतर आता त्यांच्या उत्पादनाची व्यवस्था देशातच केली जात आहे. मात्र, प्रत्यक्ष उत्पादनासाठी दोन वर्षे लागतील. दरम्यान, जपान आणि व्हिएतनामकडून रेअर अर्थ मॅग्नेट्स खरेदी करण्याचं काम सुरूये. इलेक्ट्रिक वाहने आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये त्यांचा वापर केला जातो. रेअर अर्थ मॅग्नेट्सच्या देशांतर्गत उत्पादनासाठी अनुदान योजना सुरू करण्याबाबत १५ ते २० दिवसांत निर्णय घेण्यात येईल, असं केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी सांगितलं. या योजनेअंतर्गत अनुदानाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी भागधारकांशी चर्चाही सुरू असल्याचे ते म्हणाले.

जर एकूण प्रोत्साहन एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल तर ही योजना केंद्रीय मंत्रिमंडळाकडे मंजुरीसाठी पाठविली जाईल. हैदराबादची एक कंपनी यात रस दाखवत आहे. या वर्षाच्या अखेरपर्यंत ५०० टन पुरवठा करण्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. आम्ही खाण मंत्र्यांशी चर्चा केली आहे. आमचे सचिव आणि आमचं मंत्रालय यावर काम करत आहेत. १५ ते २० दिवसांत निर्णय होईल, असं मला वाटतं, अशी प्रतिक्रिया अवजड उद्योग मंत्रालयाचे सचिव कामरान रिझवी यांनी दिली.

चीनने अलीकडेच महत्त्वाच्या धातूंच्या निर्यातीवर घातलेल्या निर्बंधांमुळे भारतासह अनेक देशांमध्ये ऑटोमोबाइल आणि सेमीकंडक्टर चिप उत्पादनात मोठ्या प्रमाणात व्यत्यय आला आहे. दुर्मिळ खनिजाच्या प्रत्यक्ष उत्पादनासाठी सुमारे दोन वर्षे लागतील, असे सचिवांनी सांगितले. या दरम्यान, जपान आणि व्हिएतनामसह पर्यायी स्त्रोतांकडून सोर्सिंगची शक्यता शोधण्यासाठी सरकार उद्योगासोबत काम करेल. जपान आणि व्हिएतनाममध्ये दुर्मिळ खनिजे उपलब्ध आहेत, तेथून ते घेण्याचा आमचा प्रयत्न असल्याचंही त्यांनी सांगितले.

## राजोरीत घुसखोरी करणारा दहशतवादी ठार

**राजौरी, दि. २५ वृत्तसंस्था**

'ऑपरेशन सिंदूर'नंतर दहशदवाद्यांचा घुसखोरी करण्याचा दुसरा प्रयत्न लष्कराने उधळला. केरी सेक्टरमधील बारात गाला परिसरात मंगळवारी सकाळी पाकिस्तानकडून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका दहशतवाद्याला लष्कराने ठार केले. हे तीन ते चार दहशतवादी असल्याचे सांगण्यात येत आहे. सतर्क जवानांनी गोळीबार सुरू करताच इतर दहशतवादी परत पळून गेले. ठार झालेल्या दहशतवाद्याचा मृतदेह नियंत्रण रेषेजवळच पडला आहे. सकाळी ८ ते ९ च्या सुमारास भारतीय लष्कराला बारात गाला परिसरात नियंत्रण रेषेपलीकडून काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या. घुसखोरीचा प्रयत्न होत असल्याचे लक्षात येताच सतर्क जवानांनी गोळीबार सुरू केला. पाकिस्तानी लष्कराने सायंकाळी ठार झालेल्या दहशतवाद्याचा मृतदेह उचलण्याचा प्रयत्न केला, पण जवानांनी गोळीबार करून तो प्रयत्नही हाणून पाडला. मृतदेह नियंत्रण रेषेवरच (झिरो लाईन) पडून आहे.

## भाषा संवर्धनासाठी राज्य मराठी विकास संस्था

राज्य मराठी विकास संस्था ही मराठी भाषेच्या विकासाकरता प्रयत्न करणारी महाराष्ट्र शासनपुरस्कृत संस्था आहे. "मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास" हे संस्थेचे बोधवाक्य आहे.विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा ही आकाराने पिंपळपनासारखी असून ती मराठी वर्णमाला वापरून तयार करण्यात आली आहे.

या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेण्यात येतात. भाषा व संस्कृती या क्षेत्रांत मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय तसेच अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही उपक्रम पार पाडण्यात येतात. राज्य मराठी विकास संस्था' मराठी भाषेच्या संवर्धनार्थ काम करते. संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केल्याप्रमाणे संस्थेची प्रमुख

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
**राज्य मराठी विकास संस्था**
मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.

तसेच भाषेशी संबंधित असलेल्या तंत्रविद्यांचा विकास करणे. वेळोवेळी भाषिक पाहणीचे कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून व मराठीच्या विविध व्यवसायक्षेत्रांतील स्थितिगतीचे

**लोकजागर**

निरीक्षण करून त्यांचे समाज भाषावैज्ञानिक अहवाल शासनाला सादर करणे,शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे.शिष्टाचार, औपचारिक भाषाव्यवहार व भावाभिव्यक्ती समृद्ध करण्यासाठी भाषिक नमुने निर्माण करणे व उपलब्ध करणे.मराठी भाषेतून नव्या ज्ञानाची निर्मिती होण्यासाठी परिभाषेची घडण, निरनिराळ्या ज्ञानस्रोतांची उपलब्धी, भाषेचा

**लोक सेवार्थ**

सृजनशील वापर वाढविणारे कृतिकार्यक्रम यांना प्रोत्साहन देणे.बहुजनांच्या बोलीभाषा आणि प्रमाण मराठी यांच्यातील अभिसरण वाढवून त्यांच्या समवर्ती संबंधातून मराठी भाषा अधिकाधिक लोकाभिमुख व समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे.लेखनविषयक नियम, वर्णमाला, भाषिक वापराची यांत्रिक उपकरणे, संगणकीय आज्ञावली यांच्या वापरात सुसूत्रता व सुबोधता आणण्यासाठी शासनाला मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देणे. माहिती तंत्रज्ञानविषयक गरजा लक्षात घेऊन मराठीत अनुरूप आज्ञावली विकसित करणे हि उद्दिष्टे आहेत.

दिनांक २५ जून १९७९ रोजी मुंबई येथे `महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान' या विषयावर एक परिषद घेण्यात आली होती. त्या परिषदेत मराठी भाषेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापण्यात यावी, अशी सूचना करण्यात आली. याविषयी विस्तृत टिप्पणी करण्यासाठी एक अनौपचारिक अभ्यासगट निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या अभ्यासगटाचे निमंत्रक म्हणून प्रा. वसंत बापट आणि अन्य सदस्य म्हणून प्रा. मे.पुं. रेगे, प्रा. वसंत दावतर, डॉ. अशोक केळकर आणि प्रा. मं.वि. राजाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आली. अभ्यासगटाच्या सदस्यांनी एक टिप्पणीवजा आराखडा तयार केला. जो मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अनुकूल असा होता.

## नोव्हो नॉर्डिस्कचे वजन व्यवस्थापन औषध विगोव्ही आता भारतात उपलब्ध

नोव्हो नॉर्डिस्क ही डॅनिश औषध कंपनी आहे जिच्याकडे दीर्घकालीन रोगांची काळजी घेण्यासाठी १०० वर्षांहून जास्त काळाचा वारसा आहे आणि तिने भारतामध्ये विगोव्ही (इंजेक्शन घेण्यायोग्य सेमाग्लुटाइड) लाँच करण्याची घोषणा केली. विगोव्ही हे एक आठवड्यात एकदा इंजेक्शन घेण्यायोग्य ग्लुकागॉन-सारखे पेप्टाईड-१ रिसेप्टर अगॉनिस्ट (जी.एल.पी-१ आर.ए) असून हे स्थूलतेने त्रस्त असलेल्या लोकांसाठी भारतात दीर्घकालीन वजन व्यवस्थापन आणि महत्त्वाच्या प्रतिकूल हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी घटनांची (एम.ए.एस.इ ची) जोखीम कमी करण्यासाठी दर्शविलेले पहिले आणि एकमेव औषध आहे. हे पाच डोस ताकदींमध्ये उपलब्ध असून त्यात अभिनव वापरण्यास सुलभ पेन उपकरणाची सोय आहे. विगोव्ही हे एक प्रिस्क्रिप्शन-केवळ औषध आहे ज्यामध्ये लठ्ठपणा किंवा जास्त वजन असलेल्या लाखो भारतीयांचे जीवनमान सुधारण्याची क्षमता आहे. INDIAB च्या अभ्यासानुसार, भारतात सामान्यीकृत लठ्ठपणा असलेले २५४ दशलक्ष




लोक आणि पोटातील लठ्ठपणा असलेले ३५१ दशलक्ष लोक आहेत.

**दखल**

जास्त वजन आणि लठ्ठपणा असलेले लोक राहणाऱ्यांमध्ये भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. चिंताजनक म्हणजे, लठ्ठपणा हा २०० हून अधिक आजारांशी संबंधित आहे, ज्यामध्ये हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, विशिष्ट प्रकारचे कर्करोग आणि टाइप २ मधुमेह यांचा समावेश आहे. लठ्ठपणाबद्दल गैरसमजांमध्ये असे म्हटले जाते की ते चुकीच्या जीवनशैली निवडी आणि स्वयं-शिस्तीच्या अभावाचा परिणाम आहे. तथापि, लठ्ठपणा अनेक वेगवेगळ्या घटकांमुळे होतो, ज्यामध्ये अनुवंशशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाज आणि आपण ज्या वातावरणात राहतो त्यासह. टाइप २ मधुमेह किंवा दमा यासारख्या इतर जुनाट आजारांप्रमाणे, लठ्ठपणासाठी प्रभावी उपचार उपायांसह दीर्घकालीन व्यवस्थापन आवश्यक आहे. विगोव्ही हे फक्त औषधपत्र (प्रिस्क्रिप्शन) दिल्यावरच दिले जाणारे औषध आहे जे लाखो भारतीयांमध्ये स्थूलतेने त्रस्त किंवा वजन जास्त असलेल्या लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याची क्षमता ठेवते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

## अभिनंदन वर्धमान यांना पकडण्याचा दावा करणारा पाकिस्तानी लष्कराचा अधिकारी तालिबानच्या चकमकीत ठार

**खैबर पख्तूनख्वा, दि. २५ वृत्तसंस्था**

भारतीय हवाई दलाचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांना पकडण्याचा दावा करणारा पाकिस्तानी लष्कराचा अधिकारी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. २०१९ मध्ये भारतीय वैमानिक अभिनंदन वर्धमान यांना पकडण्यात सहभागी असलेला पाकिस्तानी लष्कराचा अधिकारी मोईज अब्बास शाह हा पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा भागात तालिबानच्या चकमकीत ठार झाल्याचं वृत्त आहे. खैबर पख्तूनख्वा भागात तालिबानच्या बरोबर झालेल्या चकमकीत पाकिस्तानी लष्कराचे दोन जवान ठार झाले असून या दोन जवानांपैकी मोईज अब्बास शाह हा एक होता. पाकिस्तानी लष्कराच्या एका निवेदनात या संदर्भातील माहिती देण्यात आली असून या कारवाईत दोन सुरक्षा कर्मचाऱ्यांसह ११ टीटीपी दहशतवादी मारल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, २०१९ मध्ये मोईज अब्बास शाह याचं नाव समोरं आलं होतं, तेव्हा दावा करण्यात आला होता की भारतीय हवाई दलाचे विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांना पकडणारा तो पाकिस्तानी अधिकारी होता. त्यानंतर मोईज अब्बास कोण आहे? याबाबत चर्चा रंगली होती. दरम्यान, पाकिस्तानी वृत्तवाहिन्यांनी मोईज अब्बासच्या मृत्यूचं वृत्त दिलं असून पाकिस्तानी लष्कराने मोईज अब्बासच्या मृत्यूची मंगळवारी पुष्टी केल्याचं वृत्तात म्हटलं आहे.



## भारतासोबत पीओके-दहशतवादावर चर्चा करण्यास तयार
### पाकची सौदीला मध्यस्थीसाठी विनंती

**इस्लामाबाद, दि. २५ वृत्तसंस्था**

जम्मू- काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध विकोपाला गेले आहेत. भारताने सिंधू पाणी करार स्थगित केल्यामुळे पाकिस्तानात दुष्काळसदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाक सरकारने भारत सरकारसोबत संबंध सुधारण्याचे बरेच प्रयत्न केले, मात्र यापुढे दहशतवादाच्या मुद्द्यावरच चर्चा होणार, असा पवित्रा भारताने घेतला आहे. अशातच आता, पाकिस्तानातील शेहबाज सरकारने सौदी अरेबियाकडे मध्यस्थी करण्याची विनंती केली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ हे भारताशी चर्चा करुन दहशतवाद, पाकव्याप्त काश्मीर आणि द्विपक्षीय व्यापाराचे प्रश्न सोडवू इच्छितात. यासाठी त्यांनी सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान अब्दुलअजीज अल सौद यांना मध्यस्थी करण्याची विनंती केली आहे. पाकिस्तानी वृत्तवाहिनी न्यूजनुसार, शाहबाज शरीफ यांनी मोहम्मद बिन सलमान यांच्याशी फोनवर चर्चा केली, या दरम्यान त्यांनी पीओके, सिंधू पाणी करार, व्यापार आणि दहशतवाद यावर भारताशी बोलण्यास तयार असल्याचे सांगितले.

## पोलिस पत्नीची वर्दी घालून पतीने अनेकांना गंडवले

**नाशिक, दि. २५ प्रतिनिधी**

पोलिस अधिकारी असलेल्या पत्नीचा गणवेश परिधान करून अनेकांची फसवणूक करणाऱ्या तोतया पोलिसांना नाशिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. नाशिक शहरासह अनेक ठिकाणी या तोतया पोलिसाने फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. अखेर नऊ महिन्यांनंतर नाशिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. सागर पवार असे आरोपीचे नाव आहे. सागर पवारवर या आधी विविध गुन्ह्यांमध्ये कारवाई झाली आहे. तोतया पोलिस अधिकारी असल्याची बतावणी करून उपनिरीक्षक असलेल्या पत्नीच्या वर्दीचा तो वापर करत होता. या माध्यमातून त्याने अनेकांना गंडा घातला आहे. पोलिस पत्नीच्या गणवेशाचा वापर करून तो स्वतः उपनिरीक्षक असल्याचे भासवत होता. नऊ महिन्यापासून सागर पवार हा फरार होता. अखेर त्याच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत सापळा रचला आणि सागरला अटक केली आहे. या प्रकरणी आता त्याची चौकशी केली जाणार आहे.




## तुम्ही आणीबाणी पेक्षाही वाईट वागले- बच्चू कडू

**अमरावती, दि. २५ प्रतिनिधी**

भावना शून्य असलेले लोक सरकारमध्ये आहेत, त्यांना संवेदना नाहीत. आज राज्यात दर दिवशी दहा ते पंधरा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. एमआरइजीएसच्या मजुरांची मजुरी अजून मिळाली नाही. एकीकडे पैसे नाही असं सांगायचं आणि आपल्या प्रदर्शनाची सामान्य माणसांना किती वेदना होत असेल याची कल्पनाही नाही. सत्तेवरचा अंकुश आता सुटलेला आहे. अशी बोचरी टीका प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी केली आहे. अंदाज समितीचा कार्यक्रम पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अंदाज समितीच्या सदस्यांची मेजवानी थेट चांदीची थाळीतून झाल्याचे समोर आल्याने नव्या वादाला तोंड फुटलं आहे.यावर भाष्य करताना बच्चू कडू यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे. ते अमरावतीत बोलत होते.

दरम्यान, एखाद्या कसायाने रोज गाई-म्हशी कापायच्या आणि एकदा चारा खाऊ घालायचा याला काय अर्थ आहे? तुम्ही काय वेगळं करताय? रामाचे खरे भक्त असाल तर सांगा एकही ईडी चौकशी अजून भाजपच्या माणसावर का झाली नाही? तुमच्यात एकही भ्रष्टाचारी नाही का? तुम्ही आणीबाणी पेक्षाही वाईट वागले, हे संपूर्ण देशाला माहिती आहे. असेही बच्चू कडू म्हणाले.

अनेकांना वाटत होतं का बच्चू कडूचं मन पदात आहे. पण ते चुकीच आहे. आमदारकी



गेली म्हणजे किंवा अध्यक्ष पद गेलं म्हणजे बच्चू कडू थांबणार, अस नाही. एखादी आमची जेल वारी झाली तरी आम्हाला फरक पडत नाही. मात्र तानाशाही किती करावी याची काही हद्द आहे. अपात्र केलं यांची फाईल एक महिना कुठे दाना खात होती? अजूनही मला अपात्रतेची नोटीस मिळाली नाही. बच्चू कडूला बदनाम करण्याचा हा प्रयत्न करत आहे. भाजप मधील काही लोक आम्हाला बदनाम करत आहे. बँक तोट्यात अशी आमची बदनामी विरोधक करत आहे. संचालक यांनी देखील बँकेची बदनामी करू नये. तर मी फडणवीस यांना फोन करेल, कॉम्प्रोमाईज होईल, असे अनेकांना वाटत होते. पण असे होणार नाही. कारण माझ्या आडनावा मागे कडू लागलेले आहे.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313